MAHMARI 19358/13/1/2000 - TC

प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः
विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष सतरावे/अंक २/फेब्रुवारी २०१७

## संपादकीय

### जागतिकीकरण व आर्थिक उदारमतवादाचे भवितव्य

८ नोव्हेंबर २०१६ हा दिवस जगाच्या व अमेरिकेच्या इतिहासात अतिशय महत्त्वाचा ठरला. या दिवशी डोनाल्ड ट्रम्प हे अमेरिकेचे ४५ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून अधिकृतरित्या निवडून आले. डोनाल्ड ट्रम्प हे रिपब्लीकन पक्षाचे उमेदवार होते. अमेरिकेतील रिपब्लीकन पक्षाची निशाणी हत्ती आहे. अमेरिकेतील दुसरा महत्त्वाचा राजकीय पक्ष डेमॉक्रेटीक पक्ष असून ह्या पक्षाची निशाणी गाढव आहे. 'दिशा'च्या नोव्हेंबर २०१६च्या अंकातील संपादकीयमध्ये ट्रम्प यांच्याविषयी व त्यांच्या धोरणांविषयी उहापोह करण्यात आला होता. ह्या संपादकीयामध्ये आपण जागतिकीकरणाची चर्चा करणार आहोत. त्या अनुषंगाने डोनाल्ड ट्रम्प यांचा उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरते. याचे कारण अमेरिका जागतिकीकरणाच्या प्रवाहातील अतिशय महत्त्वाचे राष्ट्र आहे व या राष्ट्राची जागतिकीकरणाविषयीची भूमिका फार महत्त्वाची ठरते. अमेरिका सद्यस्थितीत तरी जागतिकीकरणाला, प्रामुख्याने आर्थिक जागतिकीकरणाच्या धोरणाला कडाडून विरोध करताना आढळते. त्यामुळेच येथे ट्रम्प साहेबांचा उल्लेख करावा लागला. ट्रम्प यांनी आपल्या निवडणूक प्रचारा दरम्यान हे स्पष्ट सांगितले होते की, ते अमेरिकेच्या फायद्याचे ठरणारे आर्थिक निर्णय राबवतील. याचाच एक भाग म्हणून ते सध्या अमेरिकेतील विविध कंपन्यांना निक्षून सांगत आहेत की, त्यांनी आपले अमेरिकेतील बस्तान न गुंडाळता स्थानिक लोकांना अधिकाधिक नोकऱ्या उपलब्ध करून द्याव्यात. अमेरिकेतील ओहायो (Ohio), पेनसिलव्हॅनिया (Pennsylvania), मिशिगन (Michigan) व आयोवा (Iowa) ह्या राज्यांना गंज चढलेली राज्ये म्हणतात, कारण ह्या राज्यांतील अनेक कारखाने बंद पडलेले आहेत व कामगार बेकार झालेले आहेत. नेमक्या ह्याच कामगार वर्गाने ट्रम्प यांना मोठ्या प्रमाणावर मतदान केलेले आढळते व ह्या मतदानाच्या जोरावर डोनाल्ड ट्रम्प यांचा विजयाचा मार्ग मोकळा झाला.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या कारकिर्दीत आर्थिक उदारीकरण, जागतिक मुक्त बाजारपेठा व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला मोठी खीळ बसेल असे जाणकारांचे मत आहे. याचे कारण डोनाल्ड ट्रम्प यांनी उपस्थित केलले काही मुद्दे होत. आपण अगोदर पाहिलेच की, त्यांनी अमेरिकेच्या कंपन्यांना अमेरिकेतच विविध वस्तूंचे उत्पादन करण्याचे आदेश दिले आहेत; नव्हे तसे निक्षून सांगितले आहे. यापूर्वी ह्या कंपन्या जगातील विविध देशांमध्ये,

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

प्रामुख्याने अशा देशांमध्ये की जेथे उत्पादन खर्च कमी असेल व स्वस्त दरात कामगार उपलब्ध होतील अशा ठिकाणी कारखाने उघडण्यावर भर देत होत्या. या धोरणामुळे तिसऱ्या जगातील चीन व भारत ह्या देशांचा तसेच दक्षिण अमेरिकेतील देशांचा फायदा होत होता कारण ह्या देशांमध्ये रोजगारांच्या संधी उपलब्ध होत होत्या. यापुढे ट्रम्प यांच्या धोरणामुळे तिसऱ्या जगतातील बेकारीचे प्रमाण वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

ट्रम्प साहेबांच्या धोरणांचा सरळ सरळ फटका भारतातील माहिती तंत्रज्ञान (Information Technology) क्षेत्रात असलेल्या कंपन्यांना बसणार आहे असे देखील भाकीत तज्ज्ञ मंडळींनी केले आहे. त्यामुळे भारतातील 'टीसीएस्' (TCS), विप्रो (Wipro), इन्फोसिस (Infosys) इत्यादी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या नामांकित कंपन्यांचे व्यवस्थापन चिंताग्रस्त झालेले दिसते. नुकतेच भारतातील सर्वात बड्या व विश्वासार्ह समजल्या जाणाऱ्या टाटा उद्योग समूहातील अंतर्गत वादळ क्षमले आहे. आपणास माहीत आहेच की काही वर्षांपूर्वी रतन टाटा यांनी टाटा उद्योग समूहातून निवृत्ती घेऊन ह्या समूहाच्या अध्यक्षपदाची सूत्रे सायरस मिस्त्री यांच्याकडे सूपूर्त केली होती. मात्र, अवघ्या चार वर्षांतच रतन टाटांनी सायरस मिस्त्रींना अध्यक्षपदावरून हटवून नटराजन चंद्रशेखरन यांची नवे अध्यक्ष म्हणून नेमणूक केली आहे. चंद्रशेखरन हे टाटा उद्योग समूहाला व भारतातील तसेच जगभरातील अनेक देशांना (यात अमेरिका व युरोपचा समावेश होतो) व उद्योग जगताला चांगलेच सुपरिचित आहेत. याचे कारण चंद्रशेखरन यांनी टाटा उद्योग समूहाच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेण्यापूर्वी ते ह्याच उद्योग समूहातील 'टीसीएस्' (टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस) ह्या माहिती तंत्रज्ञान कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी (इंग्रजीत याला चीफ एक्झिक्यूटीव्ह ऑफिसर – Chief Executive Officer असे म्हणतात) म्हणून कार्यरत होते. चंद्रशेखरन तमीळनाडू ह्या दक्षिणेतील राज्यातील नमक्कल ह्या जिल्ह्यातील मोहनूर ह्या गावी १९६३ साली जन्माला आले. १९९६ पूर्वी नमक्कल जिल्हा हा सालेम ह्या जिल्ह्याचा भाग होता. त्यांनी आपले शालेय शिक्षण तामीळ माध्यमाच्या शाळेतून घेतले व त्यानंतर कोइम्बतूर जिल्ह्यातील कोईम्बतूर इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ह्या संस्थेतून 'ॲप्लाईड सायंसेस' मध्ये पदवी घेतली. त्यानंतर त्यांनी १९८६ मध्ये तिरुचिरापल्ली ह्या जिल्ह्यातील रिजनल इंजिनिअरींग कॉलेज ह्या संस्थेतून 'मास्टर ऑफ कॉम्प्यूटर ॲप्लीकेशन्स्' ही पदव्युत्तर पदवी घेतली व १९८७ मध्ये ते 'टीसीएस्' ह्या कंपनीत रुजू झाले. सध्या रिजनल इंजिनियरींग कॉलेजला नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी म्हटले जाते. मुख्य कार्यकारी अधिकारी हा तत्सम् कंपनीचा सर्वेसर्वा असतो. त्याला अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्याचे व कंपनी त्याच्या मर्जीप्रमाणे चालविण्याचे अधिकार व स्वातंत्र्य असते. चंद्रशेखरन यांनी 'टीसीएस्' ह्या कंपनीला भारतातील नंबर एकची माहिती तंत्रज्ञान कंपनी बनविण्याची किमया केली होती. हे सगळे येथे सांगण्याचा उद्देश एकच आहे की, टीसीएस् ह्या कंपनीला आता आपला व्यवसाय (Business) टिकवून ठेवण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागणार आहे. कारण एकंदरीतच जगातील प्रगत देशांचा कल आर्थिक उदारीकरण व जागतिकीकरणातून अंग काढून घेऊन स्वतःच्या आर्थिक फायद्याचे संरक्षणवादी धोरण

(पृष्ठ क्र. ३९ वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष सतरावे/अंक २/फेब्रुवारी २०१७

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २१ वे/अंक ८ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | सुभाष गं. शिंदे | |
| २) | पाण्याचा पुनर्वापर: सिंगापूरचा स्तुत्य उपक्रम | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | ओळख वनस्पतींची टेंभूर्णी / तेंदूपत्त्याचे झाड | श्री. प्रकाश दुधाळकर | ६ |
| ४) | नर्मदा परिक्रमा (भाग : ३६) | श्री. अरविंद ओक | ८ |
| ५) | मूल्यवेध-८: पुनर्नवीकरण | श्री. नरेंद्र गोळे | ११ |
| ६) | भगवान शिव व विष्णुच्या धामाचे प्रवेशद्वार : हर(री)द्वार | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | १४ |
| ७) | भारती फॅन्टसी : भारतीय इंग्रजी कादंबरीचे बदलते संदर्भ | प्रा. प्रशांत धर्माधिकारी | २२ |
| ८) | अहो शब्दराजे, ऐका! | श्री. अरविंद दोंडे | २६ |
| ९) | सुलभा ब्रह्मे: एक लढाऊ पर्व | प्रा. अपर्णा कुलकर्णी | २८ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | ३० |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# पाण्याचा पुनर्वापर: सिंगापूरचा स्तुत्य उपक्रम

*सांडपाण्याच्या पाण्यावर प्रक्रिया करून ते पुन्हा वापरण्यायोग्य करण्याची यंत्रणा सिंगापूरमध्ये उभारलेली आहे. त्याची माहिति या लेखात आहे - संपादक*

सिंगापूर हा एक लहानसा देश आहे. या देशात साधारणपणे ५० लाख लोक राहतात. याखेरीज लाखो लोक पर्यटक म्हणून येतात. त्या सर्वांना पाण्याची गरज लागते. त्याचा पुरवठा करणे हे सरकारला एक मोठे आव्हान आहे. सिंगापूरच्या शासनाने ते लीलया पेलले आहे. पावसाच्या माध्यमातून जे काही पाणी मिळते ते साठविण्यासाठी त्यानी जलाशये निर्माण केली आहेत. या जलाशयातील पाणी प्रदूषित होणार नाही याची ते काळजी घेतात. या मार्गाने त्यांची फारच थोडी गरज भागते. विषुववृत्ताच्याजवळ असल्याने वातावरण सतत उष्ण असते. त्यामुळे पिण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पाणी लागते. त्यासाठी ते मलेशिया या देशाकडून पाणी विकत घेतात. इसवी सन २०६० पर्यंत पाणी विकत देण्याचे मलेशिया सरकारने मान्य केले आहे. त्यानंतर काय? असा प्रश्न योजना आखणाऱ्यांपुढे आहे. त्याहीपेक्षा महत्त्वाची बाब आर्थिक आहे. पाणी विकत घेण्यासाठी देशाला दरवर्षी मोठी रक्कम मोजावी लागते. त्यावर लवकर तोडगा काढणे आवश्यक आहे.

पाण्याची गरज तर वाढतच जाणार आहे. ती पूर्ण करण्याचे आणखी काही वेगळे मार्ग आहेत काय याचा विचार देशाच्या भविष्याची काळजी करणारे विचारवंत करू लागले. सिंगापूर हा बेटांचा देश आहे. त्यामुळे अर्थातच त्यांना समुद्राचे पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. मध्य पूर्वेतील काही देश समुद्राच्या खाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करून ते पिण्यायोग्य बनवितात. त्या मार्गाचा अवलंब करायला त्यानी सुरुवात केली. त्यातून पाणी पुरवठ्यात थोडी भर पडली. याहीपेक्षा एक चांगला मार्ग त्यानी शोधून काढला. तो म्हणजे वापरलेल्या पाण्याचा पुन्हा वापर करण्याचा. आपल्याकडे एकदा पाणी वापरले की ते टाकाऊ होते. वापरलेले पाणी आपण जलाशयात, नदीत किंवा समुद्रात सोडून देतो. ही श्रीमंती आपल्याला परवडण्यासारखी नाही याची जाणीव तेथील योजनाकारांना आधीच झाली. त्यानुसार पाण्याचा पुनर्वापर करण्याची योजना त्यांनी आखली. ती प्रत्यक्षात आणण्यासाठी 'न्यू वॉटर' या संस्थेची स्थापना करण्यात आली. अशाच एका संस्थेला भेट देण्याची संधी मला प्राप्त झाली. त्या भेटीवरच हा लेख आधारलेला आहे.



**न्यू वॉटर केंद्राची सुबक इमारत**

विद्या प्रसारक मंडळ ठाणे इतर शैक्षणिक संस्थांबरोबरच 'डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन संस्था' देखील चालविते. या संस्थेत व्यवस्थापन पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम राबविला जातो. अभ्यासक्रमात असलेले विषय शिकविण्याबरोबरच विद्यार्थ्यांना व्यवस्थापनातील प्रत्यक्ष अनुभव देण्याचा संस्थेचा प्रयत्न असतो. यासाठी विद्यार्थ्यांची औद्योगिक सहल आयोजित करण्यात येते. बऱ्याचदा ही सहल देशांतर्गत असते. यावर्षी मात्र विद्यार्थ्यांना विदेश वारी करण्याची संधी देण्यात आली. त्यासाठी आपल्या शेजारील एक प्रगत

देश म्हणून सिंगापूरची निवड करण्यात आली. विमान तिकिटांचे आरक्षण, राहण्याची व्यवस्था आणि देशात प्रवेश करण्यासाठी लागणारी परवानगी हे सगळे सोपस्कार पूर्ण करून ४० जणांचा एक चमू १८ जानेवारी या दिवशी सिंगापूरला रवाना झाला. तेथील विद्यापीठे, उद्योगधंदे याबरोबरच न्यू वॉटर संस्थेला भेट देण्याचे ठरविण्यात आले. त्यासाठी संस्थेशी आधी संपर्क साधण्यात आला. आमच्या विनंतीला मान देऊन आमच्यासाठी शैक्षणिक सहल आयोजित करण्याचे त्यांनी मान्य केले.




**केंद्राचे स्वागतकक्ष**

सांडपाण्याची निर्मिती आणि स्वच्छ पाण्याची गरज याचा विचार करून शहरात पाच ठिकाणी प्रक्रिया केंद्रे उभारलेली आहेत. यातील काहीच ठिकाणे त्यानी पर्यटकांसाठी खुली ठेवलेली आहेत. आमची भेट विमानतळाजवळ असलेल्या बेडाक येथील केंद्राला ठरली होती. या केंद्रात दिवसातून पाच वेळा शैक्षणिक सहलीचे आयोजन केले जाते. आम्हाला त्या दिवशीची दुसरी सहल देण्यात आली होती. ठरलेल्या वेळेच्या थोडे आधीच आम्ही केंद्रावर पोहोचलो. तेथील अधिकाऱ्यांनी आम्हाला थांबायला सांगितले. त्याचबरोबर एका भव्य दालनाकडे अंगुलीनिर्देश करून तेथे असलेले प्रदर्शन पाहण्याची सूचना केली. हे प्रदर्शन म्हणजे माहितीचा खजिनाच आहे. सिंगापूरची जल-समस्या आणि त्यावर शासनाने केलेली उपाययोजना याची इत्थंभूत माहिती या प्रदर्शनात आहे. जलसंपदेचे महत्त्व विशद करून पाण्याचा अपव्यय टाळण्याची गरज तेथे पटवून दिली आहे. त्याचबरोबर, आकडेवारी देऊन पाण्याचा पुनर्वापर करण्याचे महत्त्व देखील पटवून दिले आहे. पाण्याचा पुन्हा वापर करण्याचा विचार आल्यापासून झालेल्या प्रगतीचा आढावा येथे घेतलेला आहे. सांडपाणी गोळा करून त्यावर या केंद्रात कशी प्रक्रिया केली जाते याची सचित्र माहिती या प्रदर्शनात मिळते. या केंद्राला आजतागायत अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या आहेत. त्यांची मते देखील येथे उद्धृत करण्यात आली आहेत.




**केंद्राच्या प्रगतीचा आलेख**

ठरलेल्या वेळेला आमच्या सहलीला सुरूवात झाली. आमच्या सोबत आणखी दोन गट होते. त्यापैकी एक गट होता इंडोनेशियाचा. उच्च माध्यमिक स्तरावर शिकणारे ते विद्यार्थी असावेत. दुसरा गट सिंगापूरमधील एका शाळेचा होता. प्राथमिक शाळेत शिकणारे हे विद्यार्थी मोठ्या उत्साहाने केंद्राची माहिती घेत होते. केंद्रातील एका अधिकाऱ्याने केंद्राची जुजबी माहिती देऊन एका तरुण मार्गदर्शिकेकडे आम्हाला सोपविले. तिच्यामागून आम्ही एका दालनात पोहोचलो. दालन कसले मनोरंजनाचे ठिकाणच होते ते! एका कोपऱ्यात एक चौकोनी फळी होती आणि त्याच्या पुढे एक मोठा पडदा होता. त्या फळीवर बसून पडद्याकडे पाहिले की आपण वेगवेगळ्या जलाशयातून भ्रमण करतो आहोत असा भास होतो. दालनाच्या दुसऱ्या कोपऱ्यात जमिनीखालून पाईपलाईन टाकून सांडपाणी एकत्र कसे करतात याची प्रतिकृती आहे. तिसऱ्या कोपऱ्यात पाण्याच्या थेंबांचा आकार असलेली छोटेखानी आसने बनवून ठेवली आहेत. तेथे बसून पाणी या रसायनाबद्दल

बरीचशी माहिती मिळविता येते. चौथ्या कोपऱ्यात सिंगापूर शहरातील जलाशये आणि त्यातून मिळणारे पाणी याची माहिती आहे. दालनातील मधली जागा मात्र मोकळी आहे. या जागेवर बसायला सांगून मार्गदर्शक मुलीने आम्हाला बरीच माहिती दिली. त्यानंतर तेथे असलेल्या सुविधा पाहायला आम्हाला मोकळीक दिली.



**बोट प्रवासाचा आनंद घेणारे विद्यार्थी**


एक दालन संपवून आम्ही बोगद्यातून दुसऱ्या दालनात पोहोचलो. वापरलेले पाणी येथे आणल्यावर आधी मोठमोठ्या टाक्यांमध्ये भरून ठेवतात. तेथे पाणी निवळण्याची क्रिया होते. या क्रियेत पाण्यात तरंगत असलेले मोठ्या आकाराचे आणि जड कण खाली बसतात. परंतु लहान आकाराचे आणि हलके कण मात्र पाण्यातच राहतात. ते काढून टाकण्यासाठी गाळण्याची क्रिया करावी लागते. त्याची माहिती या दालनात दिलेली आहे. अतिशय बारिक छिद्रे असलेल्या गाळणीतून पाणी गाळून घेतात. त्यामुळे पाण्यात न विरघळलेले सर्व घटक निघून जातात.

गाळण्याच्या प्रकियेत न विरघळलेले घटक जरी निघून गेले तरी पाण्यात विरघळलेले सर्व घटक तसेच राहतात. त्यासाठी पाण्यावर व्युत्क्रमी परासरण प्रकिया करावी लागते. ती प्रकिया समजावून देण्यासाठी मार्गदर्शिकेने आम्हाला पुढच्या दालनात नेले. समुद्राच्या खारट पाण्यापासून पिण्यायोग्य पाणी मिळविण्यासाठी या प्रक्रियेचा उपयोग करतात. त्यात पाण्यात विरघळलेले घटक वेगळे केले जाऊन शुद्ध पाणी आपल्याला मिळते.




**व्युत्क्रमी परासरण प्रक्रिया**

वर सांगितलेल्या दोन प्रक्रियांनी पाण्यात विरघळलेले तसेच न विरघळलेले घटक वेगळे केले. तरीही पाणी पिण्यासाठी निर्धोक झाले असे म्हणता येत नाही. अतिशय लहान आकाराचे बॅक्टेरिया तसेच व्हायरस पाण्यात असण्याची शक्यता असते. त्यांना वेगळे काढणे अशक्य असते. म्हणून त्यांना मारून टाकण्याचा मार्ग स्वीकारला जातो. यासाठी अतिनील किरणांचा वापर करतात. अतिनील किरण हे जास्त ऊर्जा असलेले किरण असतात. ते आपल्याला डोळ्याने पाहता येत नाहीत. परंतु त्यांच्यामध्ये जंतूंना मारण्याची क्षमता असते. या किरणांच्या मार्गातून बाहेर पडलेले पाणी पूर्णपणे निर्जंतुक असते. हे पाणी पुन्हा वापरण्यासाठी घराघरातून पुरविले जाते. शुद्धीकरणाच्या प्रक्रियेतून बाहेर पडलेले पाणी कसे असते याची आपल्याला प्रचीती यावी यासाठी प्रत्येक व्यक्तीला एकेक पाण्याची बाटली मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे.




**पाण्याचे निर्जंतुकीकरण**

(पृष्ठ क्र. १० वर)

सोन्याचे शंभर तुकडे केले तरीही त्याची किंमत कमी होत नाही !!

# ओळख वनस्पतींची
# टेंभूर्णी / तेंदूपत्त्याचे झाड

*'ओळख वनस्पतींची' या लेखमालेतील पंधरावा भाग. 'टेंभूर्णी / तेंदूपत्त्याचे झाड' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

मित्रांनो, जंगलातील रानमेव्याची मजा जंगल परिसरात राहणाऱ्या अन् जंगलाशी जवळीक असणाऱ्यांनाच माहीत. बोरे, चिंचा, कैऱ्या व कवठ प्रत्यक्ष झाडावर चढून तोडून खाण्यातला आनंद बाजारात मिळणाऱ्या व काही दिवसांपूर्वी झाडावरून काढलेल्या त्या फळांमध्ये मिळणार नाही. जंगलात, दगड धोंड्यात फिरून झाडांचा शोध घेणे, त्यावर चढणे, चढतांना हातापायांवर पडणारे ओरखडे, जास्तच खरचटले तर घरून मिळणारा दम, यातही एक प्रकारचे थ्रील असायचे. आता जेव्हा गावाकडे जातो तेव्हा जंगलाची झालेली वाताहात पाहून अतिशय दुःख होते. स्थानिकांनी केलेली अतिक्रमणे, जंगलाच्या ठेकेदारांनी केलेली बेसुमार जंगलतोड, वारंवार लागणाऱ्या आगी, भुरट्या चोरांकडून होणारी जंगलतोड, सरपणासाठी वाळलेल्या झाडांसह सहज तोडता येणारी ओली व लहान झाडे देखील तोडून नेणारे ग्रामवासी याचा जंगलावर विपरीत परिणाम झाला आहे. वनउपजच्या नावाखाली चाललेला तेंदू पत्त्यांचा व्यापार जंगलाच्या ऱ्हासास कारणीभूत ठरला आहे. अन् याच व्यापारामुळे टेंभरासारख्या रानमेव्याचा बळी गेला आहे. पूर्वी उन्हाळ्यात दर आठवडा बाजारात हमखास विक्रीसाठी येणारी टेंभरं आता दिसेनाशी झाली आहेत. आणि झाडावर प्रत्यक्ष चढून झाडाच्या फांद्या हलवून खाली पडलेली पिकलेली टेंभरं गोळा करून आणण्याचे दिवस तर केव्हाच इतिहासजमा झाले आहेत.



टेंभरासारखा अवीट गोडीचा रानमेवा देणाऱ्या झाडाचे प्रचलित नाव आहे टेंभूर्णी. इंग्रजीत रीबर एकेरी या नावाने परिचित असणाऱ्या या झाडाचे शास्त्रीय नाव आहे Diospyros melanoxylon (DIOSPYROS MELANOXYLON) ग्रीक भाषेत Dios म्हणजे दैवी अन spyros म्हणजे फळ म्हणजेच एक दैवीफळ म्हणून नामाभिदान झालेले हे फळ विदर्भ व छत्तीसगडचा भाग वगळता इतरांना फारसे माहीत नाही. सह्याद्रीत व कोकणातही टेंभूर्णीची झाडे आहेत. पण या झाडाची फळे खाल्लेली व्यक्ती दुर्मिळच. हे एक मध्यम उंची असलेले झाड आहे. उंची साधारण २० मीटर पर्यंत. सरळ वाढणारे खोड, साल काळसर व खडबडीत खवले असलेली. पाने २० ते ३० सें.मी. लांबीची. अंडाकृती रचना. परस्परविरूद्ध एकांतरीत. फुले मळकट पांढरी. रचना जरा वेगळी. पुष्पपटलाच्या वारीमधून निघालेली २ सें.मी. लांबीची पेल्यासारखी व तोंडाकडे निमूळती होत गेलेली नळी.

या पेल्याच्या तोंडावर चार पाकळ्या विलग होऊन फुलाचा आकार धारण केलेल्या फुलांचा व्यास साधारण एक ते दीड सें.मी. फुलण्याचा कालावधी फेब्रुवारी ते एप्रिल. एप्रिल-मे मध्ये यावर हिरव्या रंगाची गोल व बोरापेक्षा मोठी साधारण ३ सें.मी. लांबीची फळे दिसू लागतात. ही फळे मात्र वर्षभर झाडावरच असतात. साधारण १० ते ११ महिन्यांनंतर पिकतात. पिकलेल्या फळामध्ये असतो अवीट गोडीचा थोडी तुरट चव वाटणारा गर. केवळ माणूसच नाही तर जंगलातील जनावरे, पक्षी देखील ही फळे पिकण्याची प्रतिक्षा करीत असतात. या फळात सहा ते आठ तपकिरी रंगाच्या लांबोळक्या बीया असतात. फळे जंगलातील प्राण्यांनी खाल्ल्यानंतर त्यांच्या विष्टेद्वारे याचा प्रसार होतो. या बीया लवकर रुजतात. साध्या बीया देखील जमिनीत पुरून रोपे करता येतात.

इतकी अवीट गोडीची फळे देणारे हे झाड मात्र शापीत आहे ते त्याच्या चिवट पानांमुळे. या पानांपासून विड्या तयार केल्या जातात. त्यामुळे त्याला विडी उद्योगाकडून प्रचंड मागणी आहे. या पानांना तेंदूपत्ता म्हणतात. ही पाने जून होण्यापूर्वीच तोडली तर विड्या करताना ती तुटत नाहीत. तसेच विड्या चांगल्या वळल्या जातात. जंगलाचे ठेकेदार दरवर्षी तेंदूपत्ता तोडण्याचे ठेके घेतात. जास्त उंचीवरील पाने सहज तोडता येत नाहीत म्हणून झाडे जमिनीच्या लगत तोडतात. त्यामुळे खोडाच्या आजूबाजूला नवीन फुटवे येऊन अगदी जमिनीवरून देखील पाने तोडता येतात. यात मोठ्या झाडांचा हकनाक बळी जातो. तसेच दरवर्षी अधिकाधिक फुटवे यावेत यासाठी जंगलात मुद्दाम आग लावली जाते. या आगीत इतर झाडे जळतातच. त्या सोबत अनेक सरपटणारे प्राणी, पक्षी व इतर प्राणी तथा कीटक हकनाक मारले जातात. जंगल ठेकेदारांना याचे काही सोयरसुतक नसते. फक्त नफा कमविणे एवढाच त्यांचा उद्देश असतो. वन विभागाचे कर्मचारी देखील याकडे कानाडोळा करतात. त्यांचेही हित कंत्राटदाराच्या हितामध्ये समाविष्ट असते. दरवर्षीच अशा आगी लागतात. जवळच्या गावातील लोक अशावेळी धावाधाव करून आग विझवितात. पण कधी आग इतकी प्रचंड असते की ती विझविणे त्यांच्याही आवाक्याबाहेर असते.

या सर्व प्रकारात टेंभूर्णीची झाडे मोठी होत नाहीत व आता फळेही मिळत नाहीत. ही फळे पित्तनाशक असून पौष्टीक आहेत. या झाडाची साल, फळे व बीया यात औषधी गुणधर्म असून स्थानिक लोक त्यांचा उपचारासाठी वापर करतात. या झाडाचे लाकूड विविध कामासाठी वापरतात. शेतीची औजारे तसेच इमारतीकरिता याचा पूर्वी वापर होई. मात्र याचा सरपण म्हणून फारसा उपयोग करीत नाहीत. कारण हे लाकूड जळत असताना त्यातून सारख्या ठिणग्या उडत असतात व त्यापासून इजा होऊ शकते.

असे हे उपयुक्त झाड व त्याची फळे आता दुर्मिळ होत आहे. जंगलावर खरेखुरे प्रेम करणारे अधिकारी व कर्मचारी जोपर्यंत निर्माण होत नाहीत तोपर्यंत जंगलाचा ऱ्हास होताना पाहायचे, की आपणच पुढाकार घेऊन जंगल वाचवायचे हे आपल्यालाच ठरवायचे आहे.

**- प्रकाश दुधाळकर**
एफ-२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर-नवघर लिंक रोड,
मुलंड (पू.), मुंबई - ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२

•••

***दिशा संपर्क दूरध्वनी***
**०२२-२५४२ ६२७०**

# नर्मदा परिक्रमा

**भाग : ३६**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत - संपादक*

**शुक्रवार २२ फेब्रुवारी २०१३. दिवस ८९ वा. बिझौली-अमगवाँ-बिसैला-माणिकपूर-देवहरा-रम्पुरी-बिछियॉ मु. खेरमाई मंदिर**

ऊन पडले. त्रास व्हायला लागला. कारण लवकर उठलो तरी निघायला ९ वाजून गेले. बसने निघून जायचा विचार. त्रास व्हायला लागला की तीव्र व्हायला लागतो. आश्रमातून निघालो तेव्हा गोस्वामी महाराजही सोबत होते. नंतर ते पुढे-मागे झाले. ते मुक्कामी पुन्हा भेटले नाहीत. पण त्यांच्याशी वाद मात्र होतोच होतो.

चारीधाम यात्रा, अमरनाथ यात्रा इत्यादींसाठी तिकीट न काढता प्रवास करणे अयोग्य नाही. कारण सरकारने संत महात्म्यांना ही सवलत दिली आहे असे यांचे म्हणणे आहे. 'तिकीट काढणे न काढणे यात काही नैतिकता, अनैतिकता आहे याबद्दल यांना काही देणे घेणे नाही. उलट पैसे नसले तर काय यात्रा करायची नाही? असा प्रश्न आहे.

बसमध्ये, ट्रेनमध्ये तिकीट विचारले तर 'नर्मदे हर' असे म्हणायचे म्हणजे कुणी विचारत नाही हेही अभिमानाने सांगत होते!

भोजनाचा योग कुठे आला नाही. माणिकपूर येथे पिंपळावर आठ-दहा मधाची पोळी दिसली. बिसौरा गावात एका दुकानदाराने प्रसाद दिला. नंतर खरेदी केलेले गूळ, शेंगदाणे यांचे पैसे घेतले नाहीत.

आजही घाटी चढून जावे लागते. बिछियाँ येईपर्यंत भरपूर वाजून गेले. पहिल्या कापड दुकानात पंचा घेण्यासाठी शिरलो. बन्सीचा टॉवेल व गमछा नाहिसा झाला. सध्या एकच टॉवेल आम्ही दोघे वापरतो.

मी बसने निघून गेलो तर पंचाइत होईल म्हणून दुकान गाठले. गप्पा मारण्यात गट्टी झाली व उतरण्याची व्यवस्था खेरमार्ग मंदिरात होईल असे दुकानदार श्री. गुरु साहू यांनी सांगितले.



ना हो करता भोजनाची व्यवस्थाही झाली. दुकानदार साहू यांच्याच घरात संध्याकाळी त्यांचा भाऊ कमलेश नंतर स्वतः गुरुभाऊ येऊन बसले होते.

रात्री तारतंत्र बिघाडामुळे दिवे गेले. डायरी लिहिणे राहून गेले.

**शनिवार २३ फेब्रुवारी २०१३. दिवस ९० वा. बिछियाँ-कटंगी-जीवाश्म राष्ट्रीय संग्रहालय/उद्यान-धुधुवा-गुतलवाह ९ कि.मी.**

काल संध्याकाळी नाही परंतु आज सकाळी मात्र अचानक सहानंतर आभाळ भरून आले आणि थोडा

पाऊस आला. सकाळी ५ वाजताच उठलो होतो. सहा वाजता नदीवर जाऊन स्नान केले. गुरू साहू चहा घेऊन आले. सोम नावाचा गोड मुलगा एकाद वर्षाचा असावा. बरोबर होता.

गुरुचा भाऊ कमलजी शिक्षक आहेत. त्यांच्याकडे चहा झाला. नंतर गुरुभाऊंकडे शिरा, चहा, न्याहारी झाली. पाऊस आल्याने पुन्हा निघायला उशीर म्हणजे ९। वाजले.

हा भाग पठारी असला तरी छोटे मोठे घाट आहेतच. मोकळा भाग विस्तृत असला तरी घाटामध्ये बरीच झाडी दिसते. करंगी गाव असेच एक, दोन कि. मी. घाट पार केल्यावर लागले. एकूण ५/६ कि. मी. पार झाल्यावर जीवाश्म संग्रहालय / उद्यान आले. याविषयी कमलजींकडून बरेच ऐकले होते.

उद्यान विस्तीर्ण आहे. साडेसहा कोटी वर्षांपूर्वीचे जीवाश्म आहेत. मानव उत्पत्ती दोन लाख वर्षांपूर्वीची मानली जाते. जीवाश्म मध्यप्रदेशाच्या ५/६ ठिकाणांहून मिळालेले आहेत. अरबी समुद्राचा एक फाटा नर्मदेच्या खोऱ्यात खूप आतपर्यंत अस्तित्वात होता. नारळाची आणि विशेषतः ताडाची झाडे पूर्णपणे दगडात/खडकात रूपान्तरित झाली आहेत. बाहेरून ती अगदी पूर्णपणे मूळच्या वस्तूसारखी म्हणजे लाकडी दिसतात. पण आतून मात्र क्रिस्टलाइज्ड आहेत. पार्कमध्ये प्रामुख्याने ताडाच्या झाडाचे अश्म पेरलेले आहेत. असे ऐकले की पूर्वी यातील काही झाडे उभी होती आणि प्रचंड प्रमाणात फॉसिल्य या उद्यानात होते. पण मोकळ्यावर, कुठल्याही संरक्षणाविना! यातील बरेच अश्म नाहीसे झाले.

आता चौकी पहारे, कुंपण सारे काही आहे. आतमध्ये संग्रहालय करून बंद खोल्यांमध्ये/काचेच्या कपाटांमध्ये नमुने ठेवले आहेत. यात बिया, शंख, जीव, अंडी यासह अनेकविध अश्म नीट मांडून ठेवले आहेत.



वैज्ञानिक दृष्टिकोनातून माहिती देणारे फलक, छायाचित्रे, मॉडेल्स ही सुद्धा आहेत. विशेष म्हणजे डायनॉसॉरचे अंडेसुद्धा येथे (दगडी झालेले) पाहायला मिळते.

भरपूर फोटो काढून झाल्यावर जवळपास २/२।। तास तिथे रमल्यानंतर निघालो. १।।च्या सुमारास धुधुवा गावातील प्राथमिक शाळेसमोर होतो. भोजन मिळेल का अशी पृच्छा केल्यावर खीरभात व वरण असे सुंदर भोजन मिळाले. अंगणवाडीमध्ये प्राथमिकच्या विद्यार्थ्यांचे भोजन तयार होते व रोज दीड वाजता मुले भोजन करत. स्वच्छ स्टीलची ताट, उत्तम स्वयंपाक, चांगला तांदूळ हे पाहिले आणि सरकारच्या या उपक्रमाबद्दल, इथे तो व्यवस्थितपणे खरोखर चालतो हे पाहून खूप बरे वाटले. तीन महिला हा स्वयंपाक करतात.

सरकार डाळीसाठी ५० रु.किलो हा दर, तर प्रत्यक्ष ८० रु. खाली डाळ मिळत नाही. त्यामुळे ॲडजस्टमेन्ट करावी लागते असे 'झारिया' सर सांगत होते. भोजनोत्तर सुट्टीमध्ये बऱ्याच गप्पा झाल्या. बन्सी कधी नव्हे ते पेंगुळला आणि तिथेच आडवा झाला.

३।। वाजून गेले. अगोदर आकाश भरून आले आणि पावसाची लक्षणे दिसायला लागली. मुक्काम शाळेत करावा तर किल्ली गावात नसते. शेवटी ढग पांगल्यावर चार वाजता बन्सीबरोबर पुढे निघालो. तीन

एक कि.मी. अंतरावर एक छोटे गाव होते. रस्त्यालगत एक मंदिर हेते. परंतु कुणी हाकेला प्रतिसाद दिला नाही.

घाटात/घाटापलीकडे एक आश्रम (२ कि.मी.) आहे असे कळले. पण पावणे-पाच झाले होते. गावात शिरत मुक्काम शोधायचे नक्की केले. बाहेरून वस्ती दिसते पण मुख्य रस्त्यापासून ते गाव आतमध्ये आहे.

आत वळून पुन्हा डावीकडे वळलो. एक गोपुर दिसत होते. मला वाटले की ते मंदिर छोटे असून फक्त दर्शनार्थींसाठी असावे. त्यामुळे माझा विचार एखाद्या घरात आश्रय मागण्याचा होता. परंतु बन्सी आत्मविश्वासाने म्हणाला की मंदिरात सर्व सोय होईल!

झालेही तसेच. मंदिरासमोरील एका व्यक्तीने हाक मारून मंदिरात उतरण्याची विनंती केली. दुर्गेची सिंहावर आरूढ अशी सुंदर मूर्ती, दोन्ही बाजूला दोन खोल्या, त्यातली एक दरवाज्याविना, तीच आम्हाला दिली गेली. आम्ही आनंदाने स्वीकारली.

कुठेही आसरा घेतला की प्रथम स्वच्छता! त्यानुसार खोली झाडली. बरोबर ओसरी व समोरचा प्रशस्त ओटासुद्धा झाडून स्वच्छ केला.

गहरू मस्कान या सज्जन व्यक्तीने रॉकेलचा दिवा (मंदिरात एक बल्ब होता), मोठी झाडणी, पिण्यासाठी कॅन भरून पाणी आणि नंतर भात-भाजी-पोळी, असा स्वयंपाक इथे पाठविला. त्याचे घर पाहून ठेवले होते. परंतु दरम्यान भरपूर पाऊस पडल्याने भोजनच देवळात आले.

- अरविंद ओक
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

•••

(पृष्ठ क्र. ५ वरून...**पाण्याचा पुनर्वापर: सिंगापूरचा स्तुत्य उपक्रम**)

न्यू वॉटर केंद्राला दिलेल्या भेटीतून आम्हाला अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. राष्ट्रीय समस्येवर मात कशी करावी याचा एक नमुना आम्हाला तिथे पाहायला मिळाला. राजकीय इच्छाशक्ती असेल तर कोणत्याही समस्येवर मात करता येते याचे न्यू वॉटर हे एक मूर्तिमंत उदाहरण आहे. घराघरातून बाहेर पडणारे सांडपाणी समुद्रात न जाऊ देता ते गोळा करण्यात येते. जमिनीखालून टाकलेल्या पाईपांद्वारे ते या केंद्रात आणून साठविले जाते. या केंद्रात त्यावर प्रक्रिया करून ते पाणी पिण्यायोग्य केले जाते. शुद्ध केलेले पाणी शेवटी नळाद्वारे घराघरात पोहोचविले जाते. यासाठी लागणारी सर्व यंत्रणा शासनाने उभारलेली आहे. याहीपेक्षा महत्त्वाचे असे की, ही सर्व यंत्रणा वर्षानुवर्षे योग्य तर्हेनें काम करीत आहे. त्याची देखभाल करण्यासाठी नेमलेली माणसे आपली ठरलेली कामे इमानेइतबारे करीत आहेत. याहीपेक्षा महत्त्वाचे असे की, पाणी समस्येवर मात करण्यासाठी निर्माण केलेली ही यंत्रणा जगाला दाखविण्यासाठी ते उत्सुक आहेत. केवळ एका गणपत्रावर आमची भेट आयोजित करण्याचे त्यांनी मान्य केले. त्यासाठी कसलेही शुल्क घेतले नाही. उलट एक पाण्याची बाटली मोफत देऊन आमची तहानच भागवली!



केंद्रात तयार केलेले शुद्ध पिण्याचे पाणी

- डॉ. सुधाकर आगरकर
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण-शीळ रोड,
काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे - ४२१२०४

तुम्ही उंच शिखरावर जरूर चढा, पण जगाने तुमच्याकडे पाहावं म्हणून नव्हे
तर त्या शिखरावरून तुम्हाला जग पाहता यावं म्हणून..

# मूल्यवेध-८: पुनर्नवीकरण

*सृष्टीच्या पुनर्नवीकरणाच्या अपार सामर्थ्याचा आपणही अंगिकार करावा आणि रोजच्याच जीवनात, रोजच्याच घटनांतून, अंतःस्फूर्तीचे सदैव पुनर्नवीकरण करत रहावे हेच उत्तम! हाच आजच्या युगाचा मौलिक संदेश या लेखात दिला आहे - संपादक*

काटकसर, पुनर्वापर, आणि पुनर्चक्रण हा भारतीय राहणीचा परंपरागत साचाच राहिलेला आहे. हे मूल्य आपल्याला काही नव्याने शिकावे, शिकवावे लागणार नाही. मात्र जागतिक पार्श्वभूमीवर, विशेषतः 'वापरा आणि फेकून द्या' ह्या अमेरिकन नीतिमत्तेवर चालणाऱ्यांना; ह्या मूल्याचा नव्यानेच शोध लागल्यामुळे ते आपल्याला 'काटकसर करा (रिड्यूस), पुनर्वापर करा (रियूज) आणि पुनर्चक्रण करा (रिसायकल)' चे तत्त्वज्ञान समजावू लागलेले आहेत.




झाड वठले तर त्याचे बुंधे, फांद्या इत्यादींच्या वापराने आपली घरे तयार होत असत. घर जुने होऊन मोडकळीस आले तर, त्याच्या लाकूड फाट्यांपासून शेतीचे औत, नांगर, बैठकीचे सामान इत्यादी तयार होत असे. तेही मोडत तेव्हा त्याची घडवंची, तिवई, खाटा, बाजा इत्यादी लहान-सहान सामानांत त्यांची आपोआपच वाटणी होऊन जात असे. त्यांचा अस्त होताच विटी-दांडू, भोवरे, लहान-सहान काष्ठमूर्ती, रिंगणी इत्यादी बारक्या खेळण्यांचा; त्यांच्या लाकडावर हक्क पोहोचत असे. तीही मोडून निरूपयोगी होताच त्यांचा होळीत निकाल लागत असे.

आपली वस्त्रे मुळातच लुगडी, लुंग्या, साड्या, धोतरे, उपरणी, फेटे, पागोटी, पंचे अशा प्रकारची बहु-उपयोगी सरळसोट प्रावरणे असत. कमरेचे सोडून डोक्याला बांधता येई. डोईचे सोडून आंघोळीकरता पंचा म्हणून वापरता येई. दिवसा उन्हापासून संरक्षण करणारे वस्त्रच रात्री उशास सहजच घेता येई. उगाच का गांधीजींनी कमरेस एक आणि अंगावर एक, अशा दोन वस्त्रांतच स्वतःला झाकून, अस्सल भारतीय पेहेरावाचे जन्मभर प्रतिनिधित्व पत्करले! बहु-उपयोगी वस्त्रांमुळे काटकसर आपोआपच साधली जात असते. पुनर्वापराला अनंत पर्याय असतात आणि पुनर्चक्रणाचे मार्ग शोधतच तर आपली संस्कृती संपन्न झाली आहे. उदाहरणार्थः धोतर फाटले की तुकडे करून पंचे. पंचे फाटले की त्याची हातपुसणी. हातपुसणी जीर्ण होताच त्यांची पायपुसणी. अशा पुनर्वापरांचे संस्कार आपल्यावर लहानपणापासून होतच असतात.

ते काहीही असो. मात्र, काटकसर, पुनर्वापर आणि पुनर्चक्रण ह्यामुळे आपले राहणीमान समृद्ध होत जाते, अल्पसंतुष्ट होत जाते, स्वावलंबी होत जाते, ह्यात मुळीच संशय नाही. ह्यालाच ते लोक मग 'ग्रीन' म्हणतात. 'पर्यावरण स्नेही' म्हणतात. हजारो वर्षांपासून आपण मात्र तसेच तर आहोत की!

चुका म्हणजेच शिक्षण आणि शिक्षण म्हणजेच जुन्या चुका परत होऊ न देणे.

दगडी कोळसा, जंगली लाकूड, लाकडी कोळसा, मातीचे तेल, नैसर्गिक वायू इत्यादी ऊर्जेचे परंपरागत स्रोत जेव्हा वाढत्या लोकसंख्येच्या गरजांना अपुरे पडू लागणार असे स्पष्ट दिसू लागले, तेव्हा अखिल मानवजात जागी झाली. सौरऊर्जा, समीरऊर्जा, लहरऊर्जा, सूर्यप्रकाश इत्यादींपासून वीजनिर्मितीचे मग वेध लागू लागले. त्यातही जलविद्युत, सौरविद्युत इत्यादी पुनर्नवीनीक्षम स्रोतांवर लक्ष केंद्रित होऊ लागले. गायीच्या शेणात गवत, पालापाचोळा, काडीकचरा मिसळून तयार होणाऱ्या गोवऱ्या; पापड, कुरडया, पापड्या, सुकवलेल्या भाज्या, आंब्या-फणसांची साठी, अन्नधान्ये इत्यादींतून ऊर्जाबचतीचे असंख्य उपाय आपल्या जनजीवनात घट्ट बांधणाऱ्या आपल्या संस्कृतीचे; अशा परिस्थितीत मला अधिकच कौतूक वाटू लागले. पुनर्नवीकरण हे मूल्य आपल्यासाठी नवे नाही. ते सहज पुरवणारी सौर ऊर्जा आपल्याकडे विपूल आहे. जगभर आज पुनर्नवीकरणाचा बोलबाला होत आहे. म्हणून मग आपल्या संस्कृतीस जगाचे नेतृत्व करण्याची संधी अनायासेच चालून आलेली आहे. परंपरागत प्रथांतून आपण जे शिकलो त्याला जागतिक बाजारपेठेत वाढते मूल्य प्राप्त होतांना दिसत आहे. आपणही काळाची ही पावले ओळखून आपल्या पद्धतींचे जागतिकीकरण कसे करता येईल, त्यापासून आपल्याला कसे लाभान्वित होता येईल ह्याचा सतत शोध घेत राहिले पाहिजे.

सौर शुष्कक (ड्रायर) वापरून आंबे-फणसांची साठी, बोरांचे बोरकूट, आमचूरपूड इत्यादी व्यवसायांना ह्यापूर्वीच सुरुवात झालेली आहे. शेणाच्या गोवऱ्यांचे नवे अवतार घेऊन, डॉ.प्रियदर्शिनी कर्वे ह्यांनी 'अप्रोप्रिएट रूरल टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट (आर्ती)'ची स्थापना केली आहे ग्रामीण भागांसाठी एक धूरविहीन चूल शोधून लोकप्रिय केली आहे.

पाणी अडवा, पाणी जिरवा; जलयुक्त शिवार; शेततळी; पाणलोटक्षेत्र विकास; जलपुनर्भरणपद्धतींचा विकास; इत्यादी योजनांद्वारे आपण जलपुनर्भरणाचे काम चांगलेच मनावर घेतलेले आहे. नैसर्गिक जलचक्राद्वारे आपल्यास दरसाल नव्याने उपलब्ध होणाऱ्या पाणी साठ्यास, समुद्रात जाण्यापासून रोखता आले, तर त्यातील केवळ काही टक्के पाणीसुद्धा आपल्यासाठी पुरे पडणार आहे. सर्व योजनांच्या पर्यवसायी परिणामांमुळे, भूमीगत जलपातळीत लक्षणीय वाढ होईल तोच सुदिन ठरणार आहे. लवकरच आपण त्या उद्दिष्टाप्रत पोहोचणे आवश्यक आहे, हे सर्वजनांना अंतःकरणातून पटावे ह्याकरताच ह्या माहितीचा प्रसार होणे गरजेचे आहे.

उष्णता सहजी उपलब्ध असते. वीज मात्र उष्णतेपासून अत्यंत खर्चिक उपायांनी तयार केली जाते. १००% उष्णता वापरावी तेव्हा जेमतेम केवळ ३०% वीज हाती लागत असते. तेव्हा विजेपासून उष्णता मिळवण्याचे सर्व प्रकार जसे की; इस्त्री, पाण्याचे विद्युततापक (गीझर), सुकलेल्या पूडी निर्माण करण्यासाठी वापरले जाणारे शुष्कक इत्यादीं ऐवजी; उष्णतेवर चालणारी इस्त्री, सौर जल-तापक, सौरशुष्कक ह्यांचा वापर केल्यास ७०% उष्णतेची बचत होऊन, एकूण ऊर्जा मागणीतच ७०% घट घडवून आणता येते. स्वयंपाकाचा वायू, नैसर्गिक वायू इत्यादी खर्चिक इंधनांऐवजी; जैववायूसंयंत्रे (बायोगॅस प्लँटस), सौर पक्कक (कुकर) इत्यादींचा वापर केल्यास स्वस्त, किंबहुना जवळपास मोफतच हे साधले जाऊ शकते. नैसर्गिक वायूचा उपयोग मग स्वयंचलित वाहनांसाठी करता येऊन; पेट्रोल, डिझेल आदी खर्चिक इंधनांच्या आयातीचा देशावरील भार हलका होऊ शकतो.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने विजेचा भार सुसह्य करण्याकरता भार-नियमन करण्याचे धोरण पत्करले. नियमन करत असताना ज्या भागास वीजपुरवठा बंद केला जात असे त्या भागातील लोक मग उभयदिक्कारक

(इन्व्हर्टर) वापरू लागले. उभयदिक्कारकाची कार्यक्षमता केवळ ५०% च्या आसपासच असते. म्हणजे नियमन-काळातील तुमची मागणी जर 'क्ष' असेल तर, वीज-पुरवठा-काळातील मागणी मग '२क्ष' होते. त्यामुळे वीजपुरवठा पूर्ववत झाल्यावर उभयदिक्कारकाच्या विजेरीच्या पुनर्भरणाचे काम सुरू होते. तेव्हा प्रत्यक्षातील मागणीच्या दुप्पट वीज वापरली जाते. अशा रीतीने मग एकूण मागणीतच दुप्पटीची वाढ नोंदवली जाते. केवळ सगळेच काही उभयदिक्कारक वापरत नाहीत म्हणूनच एकूण मागणी दुप्पट होत नाही. ह्याऐवजी मागेल त्याला, मागेल तेव्हा, मागेल तेवढी वीज पुरवण्याचे धोरण पत्करले; तर मागणीची नोंद कमी होऊन, आहे त्याच वीजनिर्मितीत समाधान होणे संभव होते. ह्यास पूरक म्हणून मंडळाने मग खासगीरीत्या सर्व प्रकारच्या पुनर्नवीनीक्षम वीजनिर्मितीस प्रोत्साहन देऊन, निर्माण होणारी वीज विकत घेण्याचे धोरण ठेवावे. जी भांडवली गुंतवणूक शासनास भारी पडते, तीच भांडवली गुंतवणूक खासगीत करू शकणारे लोकही आहेत, ज्यांच्या योगाने पुनर्नवीनीकरणाचे नवे पर्व मग उदयास येईल.

सृष्टीवरील चराचरांची अद्ययावत माहिती आपल्याला असेल तर आपण तिचा पुरेपूर वापर आपल्या फायद्याकरता करून घेऊ शकतो. ह्याचे अगदी चमकदार उदाहरण पाकव्याप्त काश्मिरातील शल्यक्रियात्मक हल्ल्यांचे (सर्जिकल स्ट्राईक्सचे) आहे. भारताचे अवकाशात भूस्थिर असलेले उपग्रह जमिनीवरील आपल्या उपखंडातील ०.६५ मीटर आकारमानाच्या कुठल्याही वस्तूचे १ मिनिटभराचे चलचित्र काढू शकतात, तत्काळ आपल्याला ते पुरवू शकतात, त्याला रात्रही आड येत नाही आणि ढगही अडथळा करू शकत नाहीत. त्यामुळे आपल्या सैनिकांना शत्रुच्या सर्व हालचालींची खडान्‌खडा माहिती, क्षणोक्षणी मिळत राहू शकते. माहितीच्या ह्या पुनर्नवीकरण क्षमतेचा धारदार प्रयोग पाकव्याप्त काश्मिरातील शल्यक्रियात्मक हल्ल्यांत केला गेला. तो किती नेमक्या प्रभावाने अंमलात आला तेही आपण सगळ्यांनी अनुभवलेच आहे.

पण पुनर्नवीकरणाच्या सृष्टीच्या सामर्थ्याची तर आपण केवळ कल्पनाच करू शकतो. केशवसुतांच्या एका विख्यात कवितेत; त्याच त्या आविष्कारांतून नवीन प्रसन्नता निर्माण करता येण्याच्या सृष्टीच्या अपार सामर्थ्याचे सुंदर वर्णन केले आहे. त्या कवितेचे नाव आहे 'अढळ सौंदर्य'!

**अढळ सौन्दर्य (जाती-दिंडी)**

तोच उदयाला येत असे सूर्य, अहो क्षितिजावर त्याच नव्हे काय?
तेच त्याचे कर न का कुंकुमानें, वदन पूर्वेचें भरति संभ्रमानें? १

तेच तरू हे तैशाच पुष्पभारें, लवुनि गेले दिसतात पहा सारे!
त्याच वल्ली तैसेंच पुष्पहास्य, हसुनि आजहि वेधिती या मनास ! २

कालचे जे कीं तेच आज पक्षी, कालच्या हो ज्या त्याच आज वृक्षीं
बसुनि गाती कालचीं तींच गानें, गमे प्रात: प्रार्थना करिति तेणें ! ३

काल जो का आनन्द मला झाला, तोच आजहि होतसे मन्मनाला;
कालचा जो मी तोच हा असें का? अशी सहजच उद्भवे मनीं शंका. ४

अशी सहजच उद्भवे मनीं शंका, काय समजुनि समजलें तुम्हांला का ?
असे अनुभव कीं - रिझवि एकदां जें, पुन्हा बहुधा नच रिझों त्याच चोजें. ५

पुन्हां बहुधा नच रिझों त्याच चोजें, कसें मगं हें वेधिलें चित्त माझें - (पृष्ठ क्र. २५ वर)

कितीही संकटे आली तरी आपल्या उद्दीष्टांपासून दूर होऊ नका. आलेल्या संकटांतूनच संधी शोधायचा प्रयत्न करा. बिकट परिस्थितीतही तुमचे मनोधैर्य खचू देऊ नका. शेवटी यश तुमचेच आहे हे नक्की. - धीरुभाई अंबानी

# भगवान शिव व विष्णुच्या धामाचे प्रवेशद्वार : हर(री)द्वार

*भारतातील अत्यंत पवित्र अशा सात धार्मिक स्थळांपैकी एक तीर्थक्षेत्र असणाऱ्या 'हरद्वार' ह्या ठिकाणाविषयी माहिती देणारा लेख - संपादक*

भारतीय संस्कृती व हिंदू धर्माप्रमाणे सात ठिकाणांचा उल्लेख मोक्ष प्राप्ती करून देणारी ठिकाणे असा आला आहे. ह्या सात ठिकाणांची वा पवित्र क्षेत्रांची यात्रा केल्यावर व्यक्तीस मृत्युनंतर मोक्ष प्राप्त होतो असा उल्लेख अनेक हिंदू धर्मग्रंथांमध्ये येतो. ही सात पवित्र ठिकाणे वा तीर्थक्षेत्रे म्हणजे अयोध्या (सध्याच्या उत्तर प्रदेशामध्ये), मथुरा (सध्याच्या उत्तर प्रदेशामध्ये), हरद्वार वा हरिद्वार (सध्याच्या उत्तराखंडामध्ये), कांची (सध्याच्या तामिळनाडूमध्ये), उज्जैन (सध्याच्या मध्य प्रदेशमध्ये) द्वारका (सध्याच्या पश्चिम भारतातील गुजरात ह्या राज्याच्या समुद्रकिनारी एकेकाळी श्रीकृष्णाची ही नगरी होती असे म्हणतात) व काशी (सध्याच्या उत्तर प्रदेशामध्ये. काशीला बनारस वा वाराणसी असे देखील संबोधले जाते.) ह्या सात ठिकाणांपैकी हरद्वार हे ठिकाण वर नमूद केल्याप्रमाणे उत्तराखंड ह्या राज्यात आहे. उत्तराखंड हे राज्य इसवी सन २००० पर्यंत उत्तर प्रदेश ह्या राज्याचाच एक भाग वा हिस्सा होते. इसवी सन २००० मध्ये भारताचे तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकारने जी तीन नवीन राज्ये निर्माण केली. त्यापैकी उत्तराखंड हे एक राज्य होय. उत्तर प्रदेशचा हिमालयातील कुमाऊ व गढ़वाल ह्या विभागांतील काही जिल्हे वेगळे करून उत्तराखंड हे राज्य बनविण्यात आले. हे राज्य प्रामुख्याने हिमालयाच्या पर्वतरांगांमध्ये वसलेले अत्यंत सुंदर राज्य असून आपल्या हिंदू धर्मग्रंथांमध्ये व प्रामुख्याने पुराणांमध्ये वर्तविलेल्या अनेक कथांशी संबंधित ठिकाणे, तीर्थक्षेत्रे व नद्या ह्या प्रदेशात आढळतात. उदाहरणच द्यायचे झाले तर गंगा नदीचा उगम असलेले 'गंगोत्री' हे पवित्र ठिकाण, यमुना नदीचे उगमस्थान असलेले 'यमुनोत्री' हे ठिकाण, महादेवाचे (शिव) 'केदारनाथ' हे पवित्र ठिकाण, विष्णुचे 'बदरीनाथ' हे पवित्र ठिकाण, 'रुद्रप्रयाग' (येथे अलकनंदा व मंदाकिनी ह्या नद्यांचा संगम होतो.), 'देवप्रयाग'(येथे अलकनंदा व भगरथी ह्या नद्यांचा संगम होतो व येथून पुढील प्रवाहास गंगा नदी असे संबोधले जाते), 'ऋषीकेश' इत्यादी हिंदू धर्मियांसाठी अतिशय पवित्र अशी असणारी धार्मिक ठिकाणे ह्याच उत्तराखंडमध्ये आहेत. उत्तराखंड मधील 'चारधाम यात्रा' देखील फार प्रसिद्ध असून ती भक्तांमध्ये लोकप्रिय आहे. ह्या चारधाम यात्रे दरम्यान भाविक केदारनाथ, बदरीनाथ, गंगोत्री व यमुनोत्री ह्या पवित्र ठिकाणांची यात्रा करतात वा भेटी देतात. त्यामुळेच उत्तराखंडाला 'देवभूमी' असे म्हटले जाते. अशा ह्या उत्तराखंडामध्येच हरद्वार हे ठिकाण वसलेले आहे.

हरद्वार ह्या शहराचे वैशिष्ट्य व एका अर्थाने महत्त्व म्हणजे येथे गंगा नदी हिमालयाच्या पर्वतरांगांतून बाहेर पडून उत्तर प्रदेशातल्या सुपीक मैदानी प्रदेशांमध्ये प्रवेश करते. ह्यानंतर ती प्रामुख्याने उत्तर प्रदेश, बिहार व पश्चिम बंगाल ह्या राज्यांच्या मैदानी प्रदेशांमधून वाहात जाऊन पश्चिम बंगालमधील 'सागर' ह्या ठिकाणी बंगालच्या उपसागराला जाऊन मिळते. हरद्वार ते सागर ह्या आपल्या प्रदीर्घ प्रवासात गंगा नदीने आपल्या गाळाने व पाण्याने हजारो एकर नव्हे तर हजारो हेक्टरचा प्रदेश सुपीक केला आहे व आपल्या भारत वर्षावर मोठे उपकार केले आहेत. (गंगोत्री ते सागर हे अंतर रस्त्याने

जवळ जवळ १९१३.६ कि.मी. एवढे आहे.) त्यामुळेच वर नमूद केलेल्या प्रदेशांना इंग्रजीमध्ये Great Gangetic Plains म्हणजेच गंगा नदीच्या खोऱ्यातील (किंबहुना गंगा नदीमुळेच सुपीक बनलेल्या) 'सुपीक मैदानी प्रदेश' असे संबोधले जाते व हे किती खरे आहे ते ह्या प्रदेशांमध्ये गेल्यावर व तेथील शेती पाहिल्यावर आपल्याला प्रचीती येते. असो, आपण पाहात होतो की, हरद्वार येथून पुढे पूर्वेच्या दिशेने वाहात जात गंगा नदी मैदानी प्रदेशात प्रवेश करते. त्याचप्रमाणे हरद्वार पासून उत्तराखंडातील हिमालयातील पवित्र तीर्थक्षेत्रांकडे जाणारा मार्ग सुरू होतो म्हणून एका अर्थाने या ठिकाणाला हिमालयातील देवभूमीचे प्रवेशद्वार असे देखील म्हटले जाते. हरद्वारहून पुढे ऋषीकेश, ऋषीकेशपासून पुढे रुद्रप्रयाग, बदरीनाथ, केदारनाथ, गंगोत्री, यमुनोत्री इत्यादी ठिकाणांकडे जाता येते. त्यामुळेच हरद्वारचा उल्लेख 'देवभूमीचे प्रवेशद्वार' (Gateway to the God's Own Land) असादेखील केला जातो.

ह्या ठिकाणाचे वैशिष्ट्य म्हणजे वैष्णव पंथीय ह्या ठिकाणाला 'हरिद्वार' असे म्हणणे पसंत करतात. विष्णुची जी अनेक नावे आहेत त्यापैकी 'हरी' हे एक होय. आपणास ठाऊक आहे की, विष्णू हा अच्युत, केशव, नारायण, राम, कृष्ण, वल्लभ, माधव इत्यादी अनेक नावांनी ओळखला जातो. ह्या अनेक नावांपैकी एक नाव 'हरी' हे असून ते विष्णू भक्तांमध्ये खूप लोकप्रिय आहे. उदाहरणच द्यावयाचे झाले तर महाराष्ट्रातील 'वारकरी पंथ' हा जनमानसात रुळलेला प्रसिद्ध वैष्णव पंथ आहे व ह्या पंथातील बरेचसे वारकरी एकमेकांना अभिवादन करतात व त्यांना पूज्य अशा विठ्ठलाला (विष्णुचा अवतार) वंदन करताना 'जय श्रीकृष्ण हरी' असे म्हणतात वा अशी घोषणा देतात. त्यामुळे विष्णुभक्त 'हरिद्वार' असे म्हणताना दिसतात. यामागचे कारण म्हणजे हरिद्वार हे ठिकाण 'बदरीनाथ' ह्या हरिच्या वा विष्णुच्या निवास असलेल्या पवित्र ठिकाणाकडे जाणारे प्रवेशद्वार म्हणजेच 'हरिद्वार' होय.

शिवभक्त (महादेवाचे भक्त) वा शैव पंथीय मात्र ह्या पवित्र ठिकाणाचा उल्लेख प्रामुख्याने 'हरद्वार' असे करताना आढळतात. याचे कारण म्हणजे येथून गंगा नदी वाहते. गंगा ही हिंदू धर्मियांना सर्वात पवित्र असणारी नदी आहे. हिंदू धर्मग्रंथांप्रमाणे गंगा नदी स्वर्गात वाहात असे. ह्या पवित्र नदीचे जल साक्षात विधात्याच्या म्हणजेच ब्रह्मदेवाच्या कमंडलूत असे. मात्र, सागर नामक राजाच्या साठ हजार पुत्रांचे मरण कपील मुनींच्या शापामुळे झाले व त्यांना मुक्ती मिळण्यासाठी गंगाजलाची आवश्यकता होती. त्यामुळे ह्या राजाच्या वंशातील 'भगीरथ' ह्या राजाने हिमालयात खडतर तपश्चर्या केली. ही तपश्चर्या करण्याचे कारण म्हणजे ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेऊन गंगा नदीला पृथ्वीवर आणणे; ज्यामुळे सागराच्या पुत्रांच्या अस्थी गंगेच्या पवित्र जलात विसर्जीत करता येतील व त्यांना मोक्ष वा मुक्ती प्राप्त होईल. धर्म ग्रंथांतील कथेनुसार भगीरथाने हजारो वर्षे अतिशय खडतर तपश्चर्या केल्यानंतर ब्रह्मदेवाने प्रसन्न होऊन गंगा नदीला पृथ्वीवर धाडण्याचे मान्य केले. मात्र, गंगा नदीच्या धारा स्वर्गातून पृथ्वीवर फार वेगाने पडल्यानंतर पृथ्वी दुभंगण्याची शक्यता होती व त्यामुळे पृथ्वीचा विनाश अटळ होता. पुराणांतील कथेनुसार ह्यावेळी महादेव (शिवा) हे संकट सोडविण्यासाठी पुढे आला. महादेवाने वेगाने पृथ्वीवर अवतरणाऱ्या गंगा नदीला आपल्या जटांमध्ये झेलून तिचा वेग कमी करून तिचे पृथ्वीवरील अवतरण पृथ्वी नष्ट न होता पूर्णत्वास नेण्याची जबाबदारी स्वीकारल्याचे दिसते. त्यानुसार गंगा नदीच्या धारा स्वर्गातून हिमालयात थेट महादेवाच्या जटांमध्ये पडल्या. महादेवाने ह्या स्वर्गीय नदीचा वेग आपल्या जटांमध्ये जखडून कमी केला व नंतर तिच्या धारा पृथ्वीवर सोडल्या अशी ही गंगावतरणाची कथा आपणास लहानपणापासून

सांगितली जाते. त्यामुळे गंगा व महादेवाचे नाते अतूट असे आहे. काही ठिकाणी तर गंगेचा उल्लेख महादेवाची वा शिवाची पत्नी असा देखील आलेला आढळतो. ही अशी संपूर्ण भारत वर्षातील अतिशय पवित्र व पूज्यनीय मानली जाणारी गंगा माता 'हरद्वार' मधून मैदानी प्रदेशात प्रवेश करते. ह्या गंगावतरणाच्या पुराण कथेमुळे देखील शैव पंथीय ह्या ठिकाणाचा उल्लेख 'हरद्वार' असा करतात. कारण येथून पुढे हिमालयात गेल्यानंतर आपण 'गंगोत्री' ह्या गंगा नदीच्या उगमस्थानापर्यंत जाऊ शकतो. येथे एक गोष्ट महत्त्वाची आहे व ती म्हणजे गंगोत्री ह्या उगमस्थानी गंगेस 'भगरथी' असे म्हटले जाते. 'हर' म्हणजे महादेव वा शिवा असा अर्थ अनेक भक्त घेतात. त्यामुळेच महादेवाच्या नावाने घोषणा देताना 'हर हर महादेव' असे म्हटले जाते. ह्या ठिकाणाला 'हरद्वार' म्हणण्यामागचे अजून एक कारण म्हणजे येथून पुढे 'हरा'चे म्हणजेच महादेवाचे हिमालयातील पवित्र स्थान 'केदारनाथ' येथे जाता येते व तेथे जाण्याच्या प्रवासाची सुरुवात येथून होते म्हणून 'हरा'कडे म्हणजेच महादेवाकडे जाण्यासाठीचे प्रवेशद्वार म्हणजेच 'हरद्वार' ह्या अर्थाने शिवाचे उपासक ह्या ठिकाणाला 'हरद्वार' असे म्हणणे पसंत करतात.

हरद्वार व महादेव यांचा संबंध सांगताना शिव पुराणातील अजून एका कथेचा येथे उल्लेख करावा लागेल. ही कथा म्हणजे शिवाची पत्नी 'सती' हिने आपला पिता दक्ष ह्याच्या यज्ञात केलेल्या प्राण त्यागाची कथा होय. ही कथा सर्वश्रूतच आहे. अनेक हिंदुंना ही कथा चांगलीच माहिती आहे. ब्रह्मपुत्र दक्ष हा सृष्टीचा पालनहार होता व त्याच्या सती नामक कन्येचा विवाह महादेवाबरोबर झाला होता. दक्षाच्या इतर कन्यांचा विवाह भृगु, कश्यप आदी ऋषींबरोबर झालेला होता. असो, तर सतीमातेचा विवाह महादेवाबरोबर झालेला होता. मात्र, दक्षाला हा विवाह पसंत नव्हता. दक्ष महादेवाला पिशाच्च, कपाली इत्यादी दूषणे देऊन 'असंस्कृत देव' म्हणून हिणवत असे. दक्ष हा स्वतः परम विष्णुभक्त होता. त्यामुळे दक्षाला सतीचा महादेवाबरोबरचा विवाह एका अर्थाने मान्य नव्हता. एकदा दक्षाने एका मोठ्या भव्यदिव्य यज्ञाचे आयोजन केले. ह्या यज्ञाला त्याने विधाता म्हणजेच ब्रह्मदेव, विष्णू व इतर सर्व देव-देवतांना निमंत्रण दिले. मात्र, त्याने महादेवाला ह्या यज्ञाला मुद्दामहून निमंत्रित केले नाही. सती मातेने जेव्हा सर्व देवांना ह्या यज्ञ समारंभ वा विधीसाठी जाताना पाहिले तेव्हा तिने महादेवाकडे 'आपणही ह्या यज्ञाला जाऊ या' असा हट्ट धरला. महादेवाने तिची समजूत काढत सांगीतले की, दक्षाने आपल्याला ह्या यज्ञाला निमंत्रण दिलेले नसल्यामुळे आपण तेथे जाणे योग्य नव्हे. सती मातेने महादेवाचे काहीएक ऐकले नाही व ती आपला पिता दक्ष याने जेथे यज्ञ घातला आहे (म्हणजेच सध्याचे हरिद्वार वा हरद्वार) ह्या ठिकाणी ती गेली. सती मातेला तेथे पाहून दक्षाला राग आला व त्याने निमंत्रित नसताना सती माता तेथे आली म्हणून तिचा अपमान तर केलाच मात्र सोबतच तिचा पती म्हणजेच महादेवाला देखील अनेक दूषणे दिली. सतीला हे अनपेक्षीत होते. तिला वाटले होते की, आपला पिता आपल्याला व आपल्या पतीला (महादेवाला) निमंत्रण देण्यास विसरला असेल. आता तिच्या लक्षात आले की असे काहीही नव्हते व दक्षाने जाणूनबुजून सती व महादेवाला ही अपमानास्पद वागणूक दिली होती. त्यामुळे सतीमातेने आपला पिता दक्ष याचा धिक्कार करून तसेच तेथे उपस्थित असलेल्या ब्रह्म, विष्णू व इतर देवतांना देखील अनेक खरेखोटे बोल सुनवून यज्ञकुंडात प्रवेश करून प्राणत्याग केला. ही घटना ह्याच ठिकाणी म्हणजेच हरद्वारमध्ये घडली व ही घटना महादेवाशी निगडित व शिवपुराणातील अतिशय महत्त्वाची घटना असल्याने 'हरद्वार' हे ठिकाण सर्वच हिंदुंच्या व प्रामुख्याने शिवभक्तांच्या दृष्टीने महत्त्वाचे

असून ह्या स्थानाचे त्यांच्यासाठी आगळे वेगळे माहात्म्य आहे. आपण मात्र, ह्या लेखात 'हरिद्वार' व 'हरद्वार' हे दोन्ही शब्द वापरणार आहोत.

हरद्वार वा हरिद्वार येथे अनेक मंदिरे असून येथील एक वैशिष्ट्यपूर्ण मंदिर म्हणजे भारतमातेचे मंदिर होय. आपण भारतीय आपल्या देशाला 'मातृभूमी' (इंग्रजीत - Motherland) असे संबोधतो. मात्र, काही संस्कृती व देशांमध्ये, राष्ट्राला 'पितृभूमी' (इंग्रजीत – Fatherland) असे संबोधण्याचा प्रघात आहे. असो; आपण अनेकदा आपल्या भारत देशाचे 'भारत मातेच्या' स्वरूपातील चित्र पाहतो. आपण आपल्या देशाविषयीचे प्रेम व्यक्त करताना 'भारतमाता की जय' ही घोषणा वा नारादेखील देत असतो. अशा ह्या भारतमातेचे २० व्या शतकातील मंदिर हरद्वार येथे आढळते. आपल्या भारतदेशाच्या नकाशावर अन्नधान्य व पाण्याचे भांडे धारण केलेली भारतमाता येथे आढळते.

हरद्वारचे अजून एक माहात्म्य म्हणजे ह्या ठिकाणी कुंभमेळा भरत असतो. कुंभमेळ्याला हिंदू धर्मामध्ये अनन्य साधारण महत्त्व आहे. कुंभमेळ्याविषयी विस्तृत माहिती देण्यासाठी आपणास पुराणांमध्ये आलेल्या सागरमंथनाची कथा पाहावी लागते. ह्या कथेनुसार एकदा देवांनी व असुरांनी मिळून सागराचे मंथन करून 'अमृत' बाहेर काढण्याचे ठरविले. हे अतिशय कठीण काम होते. त्यामुळे ह्या कामात विष्णू व शंकर ह्या महान देवांसह सर्वच देवांनी व आसुरांनी आपापल्या परीने योगदान देण्याचे व प्रयत्न करण्याचे मान्य केले. सागर मंथनासाठी मेरू ह्या पर्वताचा रवी (सागर घुसळण्यासाठी) म्हणून वापर करण्याचे ठरले. सर्पराज वासुकीचा दोरखंड म्हणून वापर करण्यात आला. स्वतः विष्णुने कासवाचे रूप घेऊन सागरात जाऊन मेरू पर्वत आपल्या पाठीवर घेतला. मेरुरुपी रवीला वासुकीरुपी दोरखंड गुंडाळण्यात आला. देवांनी वासुकीचा शेपटाकडचा भाग धरला तर आसुरांनी त्याच्या तोंडाकडचा भाग धरला व सागर मंथन म्हणजेच सागराच्या पाण्याला घुसळण्याचे काम सुरू झाले. वासुकीच्या तोंडातून जे फुत्कार निघाले त्यामुळे आसुर भाजून निघू लागले. हे सागरमंथन चालू असताना अगोदर विष बाहेर पडले. ह्या विषालाच 'हलाहल' असे म्हटले गेले. महादेवाने वा शिवाने सर्वांच्या भल्यासाठी ते विष प्राशन केले व त्या विषाच्या प्रभावाने शंकराचा कंठ निळा झाला. त्यामुळे महादेवाला 'नीलकंठ' असे संबोधण्यात आले. ह्याच कारणामुळे शंकराच्या आरतीमध्ये ''देवीदैत्यी सागरमंथन पै केले, त्यामाजी अवचित हलाहल सापडले, ते त्वा असुरपणे प्राशन केले, 'नीलकंठ' नाम प्रसिद्ध झाले'' असा उल्लेख येतो. सागर मंथनातून लक्ष्मी, इच्छा पूर्ण करणारी कामधेनू गाय, 'उच्चैश्रवा' नावाचा सफेद घोडा, ऐरावत हत्ती, 'कौस्तुभमणी' नावाचा हिरा, कल्पवृक्ष, धन्वंतरी इत्यादी दिव्य वस्तू बाहेर पडल्या. काही काळानंतर अमृतही बाहेर पडले. हे अमृत असुरांच्या हाती लागू नये म्हणून देव जेव्हा अमृतकलश घेऊन धावत होते तेव्हा ह्या कलशातील काही अमृत पृथ्वीवरील चार ठिकाणी पडले वा सांडले. ही चार ठिकाणे म्हणजे उज्जैन, नाशिक, अलाहाबाद-प्रयाग व हरद्वार ही होत. त्यामुळे ह्या चार ठिकाणी कुंभमेळे भरत असतात. ह्या कुंभमेळ्या दरम्यान भारताच्या विविध भागातील लाखो भाविक येत असतात व येथे पवित्र स्नान करत असतात. ह्या भाविकांमध्ये प्रामुख्याने वेगवेगळ्या पंथांच्या साधुंची संख्या जास्त प्रमाणात असते. दर तीन वर्षानंतर ह्या चार ठिकाणी आलटून पालटून कुंभमेळा भरत असतो. त्यामुळे ह्या चार ठिकाणांपैकी ज्या वर्षी कुंभमेळा भरतो, पुन्हा त्याच ठिकाणी बारा वर्षांनंतर कुंभमेळा भरत असतो. हरद्वारचे ह्या कुंभमेळ्यामुळे देखील मोठे माहात्म्य आहे. पुलस्त्य हे हिंदू ग्रंथांमध्ये उल्लेखिलेले एक महान ऋषी होत. पुलस्त्य व धौम्य ह्या ऋषींनी पांडव वनवासात असताना धर्मराज युधिष्ठिराला विविध

तीर्थांची तसेच ह्या तीर्थांची वा स्थळांची तीर्थयात्रा केल्यावर काय फलप्राप्ती होते याची माहिती दिली होती. ह्यावेळी अर्जुन कौरवांसोबत होऊ घातलेल्या महायुद्धात लढण्यासाठी लागणारी दिव्य शस्त्रे आणण्यासाठी हिमालयात गेला होता. पुलस्त्य ऋषींनी ज्या तीर्थांची माहिती ह्यावेळी पांडवांना दिली होती त्यात हरद्वार जवळील गंगा नदीच्या तीरावरील 'कनखल' ह्या तीर्थाचादेखील समावेश होता. ह्यावरून महाभारत काळात हरद्वार हे प्रसिद्ध तीर्थ म्हणून ज्ञात होते असे लक्षात येते.

अगोदर नमूद केलेल्या हरद्वार येथील भारतमातेच्या मंदिराचे सुरेख वर्णन डायना येक लिखीत इंडिया : अ सेक्रेड ज्यॉग्रफी (India : A Sacred Geography) ह्या इंग्रजी पुस्तकात आले आहे. वाचकांनी हे पुस्तक जरूर वाचावे. हे मंदिर १९८३ मध्ये बांधण्यात आलेले असून ते संगमरवराने बांधलेले सात मजल्याचे मंदिर आहे. ह्यापैकी सर्वात खाली भारतमातेची मूर्ती आहे. ह्या मंदिरातील एक मजला विविध राष्ट्रीय नेते व स्वातंत्र्य सैनिकांसाठीचा आहे. एक मजला पतिव्रता स्त्रियांच्या सन्मानाप्रित्यर्थ आहे. अजून एक मजला भारतातील महान साधु-संतांचा आहे. पाचव्या मजल्यावर विविध देवी आहेत. सहाव्या मजल्यावर विष्णू व त्याचे विविध अवतार असून सातवा मजला म्हणजेच सर्वात वरचा मजला शिवा वा महादेवाच्या विविध रुपांसाठीचा आहे. ह्या मजल्याला 'कैलाश' असे म्हटले जाते. हिंदू धर्म शास्त्रांप्रमाणे हिमालयातील 'कैलाश' पर्वत हे महादेवाचे निवासस्थान होय हे सर्वश्रूत आहे. ह्या मंदिरातील भारतमातेची मूर्ती संगमरवरी आहे.

हरद्वारमध्ये गंगामातेची होणारी आरती हे तेथील प्रमुख आकर्षण होय असे म्हणणे वावगे ठरणार नाही. ह्या आरतीसाठी हरद्वारमध्ये गंगानदीच्या दोन्ही तीरांवर भाविक एकत्र जमतात व वेगवेगळ्या ठिकाणांहून ही आरती साधारणतः एकदाच केली जाते. साक्षात वाहत्या गंगेलाच ओवाळले जाते व आरती म्हटली जाते. आरती संपल्यानंतर झाडांच्या पानांपासून बनविलेल्या द्रोणांमध्ये फुल, कापूर, उदबत्ती इत्यादी सामग्री टाकून हे द्रोण दिवा लावून गंगा मातेमध्ये सोडले जातात.

हरद्वारला 'गंगाद्वार' असे देखील म्हटले जाते. आपण ह्याचे दोन अर्थ घेऊ शकतो. एक म्हणजे हरद्वार हे गंगेच्या उगमस्थानाकडे म्हणजेच 'गंगोत्री' कडे जाण्याचे द्वार होय. गंगाद्वार ह्याचा दुसरा अर्थ हे गंगानदीचे हिमालयातून बाहेर पडून उत्तर भारतातील मैदानी प्रदेशांमध्ये येण्याचे वा प्रवेश करण्याचे द्वार असा देखील घेता येईल.

अगोदर नमूद केल्याप्रमाणे हरद्वारमध्ये महादेव व विष्णुची मंदिरे आहेत. येथील प्रमुख आकर्षण म्हणजे खुद्द गंगामाता होय. असे असले तरी हरद्वारमध्ये येथे इतर देवी देवतांची देखील मंदिरे आढळतात. यापैकी महादेवीचे मंदिर व मानसादेवीचे मंदिर होय. मानसादेवीचे मंदिर हरद्वारमधील एका टेकडीवर असून तेथे जाण्यासठी चालत जावे लागते वा 'विद्युत केबल कारद्वारे' जावे लागते.

हरद्वारमध्ये गंगा नदीच्या पाण्याला खूप वेग आहे. त्यामुळे भाविकांच्या स्नानासाठी विविध घाट बांधलेले असून तेथे लोखंडी खांब व त्या खांबांना लोखंडी साखळ्या जोडलेल्या आहेत. भाविकांनी ह्या खांबांना व साखळदंडांना धरून गंगेमध्ये स्नान करणे अपेक्षीत आहे. भाविकांच्या सुविधतेसाठी येथे एक विशेष कुंड बांधण्यात आलेले असून ह्या कुंडाला हिंदीमध्ये 'हरी-की-पैरी' असे म्हणतात. ह्या शब्दाचा अर्थ 'हरिचे म्हणजेच विष्णुचे पाय' असा होतो. गंगा नदीच्या पात्रातील काही पाणी वळवून तेथे हे 'हरी-की-पैरी' कुंड बनविण्यात आले असून तेथे विष्णू मंदिर असून

सर्व गोष्टींना पुरून उरणारी एकच गोष्ट आहे. ती म्हणजे : कष्ट.. कष्ट.. आणि कष्ट.

अनेक पायऱ्या देखील आहेत. बहुतांशी भाविक 'हरी-की-पैरी' मध्येच वा ह्या कुंडामध्येच गंगा स्नान करणे पसंत करतात. हरद्वारची तीर्थयात्रा केल्यावर सात अश्वमेध केल्याचे पुण्य लाभते असे उल्लेख पुराणांमध्ये येतात. त्याचप्रमाणे हरद्वारपासून शंभर मैलांपर्यंत गंगा मातेचे नाव घेतल्यावर कुठलीही व्यक्ती पूर्णपणे पापमुक्त होते व त्याला विष्णुलोक प्राप्त होतो अशी भक्तांची धारणा आहे. एवढेच नव्हे तर हरद्वारला गंगास्नान केल्यावर लाखो तीर्थांमध्ये स्नान केल्याचे पुण्य लाभते असा देखील महिमा आहे. अनेक भाविक हरद्वारमधून गंगा नदीचे पवित्र जल बाटल्यांमध्ये वा इतर भांड्यांमध्ये भरून आपापल्या स्वगृही नेतात. हे गंगाजल शिवलिंगाचा अभिषेक करण्यासाठी, रोजच्या पूजेदरम्यान, विशिष्ट धार्मिक विधीच्या वेळी, मंगल कार्याच्या वेळी, मृत व्यक्तीच्या मुखात घालण्यासाठी वा इतर धार्मिक कारणांसाठी वापरले जाते. ह्यावरून गंगा नदीच्या जलाचे माहात्म्य तसेच हरद्वारचे माहात्म्य देखील अधोरेखीत होते. हरद्वार मधून दक्षिणेकडील म्हणजेच तामीलनाडूतील रामेश्वरम् ह्या ठिकाणापर्यंत भाविकांनी गंगाजल नेल्याचे दाखले आढळतात.

अगोदर नमूद केलेले हरद्वारमधील कनखल हे ठिकाण म्हणजे दक्ष प्रजापतीने जेथे यज्ञ केला होता ते ठिकाण होय. येथे दक्ष प्रजापतीचे मंदिर आहे. ही पौराणिक कथा संक्षेपाने अगोदर सांगितलेलीच आहे. येथे सतीमातेने यज्ञकुंडात प्राणत्याग केल्यानंतर महादेवाने आपल्या जटांतून वीरभद्र नामक महायोद्धा निर्माण केला. ह्या वीरभद्राने असंख्य शिवगणांसह दक्षावर हल्ला केला, यज्ञाची नासधूस केली व दक्षाचे शीर धडापासून वेगळे केले. महादेवाने नंतर दक्षाला बोकडाचे तोंड लावून जिवंत केले. महादेवाने सती वियोगाने येथेच तांडव केले होते. त्यावेळी सती मातेचे प्राणहीन शरीर महादेवाने खांद्यावर घेतले होते. महादेव तांडव करत आहे म्हणून आता प्रलय येणार व सर्व सृष्टी नष्ट होणार हे जाणून भगवान विष्णुने आपल्या दिव्य सुदर्शन चक्राने सतीच्या मृत शरीराचे तुकडे केले. काहींच्या मते त्यामुळे सतीच्या शरीराचे बावन्न, तर काहींच्या मते बहात्तर तर इतर काहींच्या मते एकशे आठ तुकडे झाले. सतीमातेच्या शरीराचा प्रत्येक तुकडा ज्या ज्या ठिकाणी पडला तेथे शक्तीपीठे निर्माण झाली अशी पौराणिक कथा आहे. कनखल येथे सतीकुंड असून येथील दक्ष मंदिराला 'दक्ष महादेव मंदिर' असे देखील म्हणतात.

मानसादेवी ही पार्वतीमातेचेच रूप असून ह्या रुपात ती 'महिशा' ह्या राक्षसाला मारण्याचे वा मारतानाचे आपले रूप दाखविते. येथे असलेल्या वृक्षाला भाविक भक्तीभावाने लाल व पिवळे धागे वा दोरे बांधतात. तसे केल्याने भक्तांची मनोरथे पूर्ण होतात अशी श्रद्धा आहे. हरद्वारचे अजून एक महत्त्व म्हणजे वल्लभाचार्यांनी भारतातील पूरी, जुनागढ इत्यादी अनेक ठिकाणी ज्या 'बैठक' स्थापन केल्या होत्या त्यापैकी एक 'बैठक' हरद्वार येथे देखील आहे. वल्लभाचार्य हे महान वैष्णव पंथीय संत होते.

मानसादेवी प्रमाणेच हरद्वार येथे चंडीदेवीचे देखील प्रसिद्ध मंदिर आहे. हे मंदिर नील पर्वत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या टेकडीवर असून येथून गंगानदी व हरद्वार शहराचे लोभस दृश्य दिसते. हरद्वार शहरातून नील पर्वतावर जाण्याचे अंतर तीन किलोमीटर असून येथे वाटेत लागणाऱ्या जंगलात अजूनही हत्ती व इतर जंगली श्वापदे आहेत असे म्हटले जाते. पुराण कथेनुसार पार्वती मातेने शुंभ व निशुंभ ह्यांचा पराभव करून त्यांना स्वर्गातून बाहेर हाकलून देण्यासाठी 'चंडी'चे रूप घेतले होते. शुंभ व निंशुभाने इंद्राकडून स्वर्ग जिंकून घेतला होता. हरद्वारमधील सध्याचे 'चंडी' मातेचे मंदिर १९२९ मध्ये काश्मीरच्या महाराजांनी बांधलेले आहे, तर ह्या मंदिरातील 'चंडीमातेच्या' मूळ मूर्तीची स्थापना इसवी सनाच्या

८ व्या शतकात हिंदू धर्माचे पुनर्जीवन करून त्यास मजबूत करण्याचे महान कार्य केलेल्या आदि शंकराचार्यांनी केली होती असे म्हणतात.

मानसादेवीचे मंदिर बिलवा पर्वत ह्या टेकडीवर असून भाविक येथे देखील मोठ्या संख्येने जात असतात. मानसा देवी म्हणजे सदाशिवाच्या वा महादेवाच्या मनातून उत्पन्न झालेल्या शक्तीतून वा ऊर्जेतून निर्माण झालेले देवीचे रूप होय अशी भक्तांची धारणा आहे. अजून एका दुसऱ्या आख्यायिकेनुसार सप्तर्षींपैकी एक असलेले महान ऋषी कश्यप यांच्या मनातून उत्पन्न झालेली देवी म्हणजे मानसा देवी होय. हिंदू धर्मशास्त्रांप्रमाणे सप्तर्षींना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. सप्तर्षी ह्या शब्दाचा अर्थ सात ऋषी असा होतो. ह्या सप्तर्षींना वेदिक काळापासून हिंदू धर्माचे पितृतुल्य मार्गदर्शक मानले जाते. विविध हिंदू धर्मग्रंथांमध्ये ह्या सात ऋषींची वेगवेगळी नावे दिलेली आढळतात. अभ्यासकांच्या मते सप्तर्षींयांच्या नावांची सर्वात पहिली यादी जैमेन्य ब्राह्मणात आलेली असून ती नावे पुढीलप्रमाणे आहेत– अगस्त्य, अत्री, भारद्वाज, गौतम, जमदग्नी, वशिष्ठ व विश्वमित्र. बृहदारण्यक उपनिषदात आलेली यादी पुढीलप्रमाणे आहे – गौतम, भारद्वाज, विश्वमित्र, जमदग्नी, वशिष्ठ, कश्यप, अत्री. वेदांनंतर रचल्या गेलेल्या हिंदुधर्म ग्रंथांनुसार काही सप्तर्षी ब्रह्मदेवाच्या मनातून निर्माण झालेले असून ते ब्रह्मदेवाचे प्रतिनिधित्व करतात. तर काही ऋषी महेश (महादेव) व विष्णुचे प्रतिनिधित्व करतात. अनेक हिंदू असे मानतात की, वेगवेगळ्या मन्वंतरांमध्ये व युगांमध्ये वेगवेगळे मनु अस्तित्वात येतात. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या मन्वंतरांमध्ये वेगवेगळे सप्तर्षी व त्यांचे पुत्र अस्तित्वात येतात. हरद्वारमधील ह्या मानसादेवीच्या मंदिरात जाण्यासाठी वा पोहोचण्यासाठी 'केबलकार किंवा रोपवे'ने जावे लागते. येथील जंगलांमध्ये देखील जंगली श्वापदं वा प्राणी आढळतात.

हरद्वारमधील मायादेवीचे प्रसिद्ध मंदिर 'हरी–की–पैरी' येथे स्थित असून येथील मंदिराचा संबंध अगोदर उल्लेखिलेल्या सती मातेच्या प्राणत्यागाशी व त्यानंतरच्या घटना क्रमाशी आहे. दक्षाच्या यज्ञात प्राणत्याग केल्यावर शोकाकुल शंकराचे तांडव नृत्य थांबविण्यासाठी विष्णुने सतीमातेच्या मृत शरीराचे तुकडे करण्यासाठी सुदर्शन चक्राचा वापर केला व सतीमातेच्या शरीराचे अनेक तुकडे झाले व वेगवेगळ्या ठिकाणी पडले ही सर्व कथा आपण अगोदर पाहिलीच आहे. ह्या घटनेनंतर सतीमातेचे हृदय व नाभी जेथे पडली त्याठिकाणी सध्याचे मायादेवीचे मंदिर असल्याचे भाविक मानतात. ह्या मंदिरात तीन मुखे वा डोके तसेच चार हात वा भूजा असलेली मायादेवीची मूर्ती आहे. मायादेवीला शक्तीमातेचाच एक अवतार देखील मानतात.

अशातऱ्हेने हरद्वारचा धार्मिक महिमा फार मोठा आहे. भारताच्या विविध कानाकोपऱ्यांतून लाखो हिंदू भाविक हरद्वारला येत असतात. हिंदुधर्माच्या सर्वच पंथांमध्ये व प्रामुख्याने शैव व वैष्णवांमध्ये ह्या तीर्थक्षेत्राचा महिमा गायलेला आढळतो. हरद्वारमध्ये अनेक देव देवतांच्या सुबक मूर्ती असून विशेषतः महादेवाच्या भव्य व मोठ्या मूर्त्या आहेत. ह्या पवित्र ठिकाणी वर्षभर भक्तांची रीघ लागलेली असते. त्याचप्रमाणे येथे नेहमीच साधुसंतांची देखील ये–जा असते. भाविक व साधुंना उतरण्यासाठी व राहण्याची सोय म्हणून येथे खूप धर्मशाळा आहेत. तसेच इतरही अनेक सुविधा आहेत.

हरद्वारला जाण्यासाठी भाविक विमान, आगगाडी तसेच मोटारगाडीने जाऊ शकतात. हरद्वारपासून सर्वात जवळ असलेले विमानतळ म्हणजे डेहराडून येथील जॉली ग्रँट विमानतळ होय. हे विमानतळ हरद्वारपासून ३८ किलोमीटर आहे. डेहराडून ही उत्तराखंडची राजधानी होय. ऋषीकेश हे हिमालयातील दुसरे पवित्र स्थळ हरद्वारपासून रस्त्याने २३ किलोमीटर आहे. हरद्वार येथेच

सध्याचे भारतातील प्रसिद्ध योगगुरु बाबा रामदेव यांचे पतंजली योगपीठ आहे. हरद्वार ते डेहराडून हे अंतर ५२ किलोमीटर असून रस्त्याने हरद्वार हे देशाची राजधानी दिल्लीला जोडलेले असून हरद्वार-दिल्ली हे अंतर १७१ किलोमीटर आहे. हरद्वारला दिल्लीहून बसने जाता येते. तसेच हरद्वार ते दिल्ली मार्गावर अनेक आगगाड्या धावत असतात. त्याचप्रमाणे ह्या लोहमार्गावर शताब्दी एक्सप्रेस ही आगगाडी देखील धावते. अशा तऱ्हेने हरद्वार हे ठिकाण भारतातील विविध भागांशी हवाई मार्ग, रस्ते व लोहमार्गाने जोडलेले आहे. येथे भाविक व पर्यटकांसाठी अनेक हॉटेल्स देखील आहेत. हरद्वारला फक्त भारतीयच नव्हे तर परदेशातील अनेक पर्यटक देखील येत असतात. ह्या पवित्र तीर्थक्षेत्राविषयी अनेक भारतीय व परकीय लोकांनी अभ्यासपूर्ण लिखाण केलेले आहे. अशाच एका परकीय अभ्यासकांपैकी जेम्स लॉचटेफेल्ड (James Lochtefeld) हे एक होत. जेम्स लॉचेफेल्ड यांचा हिंदू तीर्थयात्रा (Hindu Pilgrimage) हा व्यासंगाचा विषय आहे. त्यांनी 'हरद्वार' ह्या शहराच्या धार्मिक माहात्म्यावर प्रबंध लिहिलेला आहे. हा प्रबंध लिहित असताना त्यांनी अनेक संस्कृत ग्रंथांचा अभ्यास करून हरद्वार मधील विविध धार्मिक स्थळे व मंदिरांना प्रत्यक्ष भेट देऊन माहिति गोळा केली होती. २००९ मध्ये हा प्रबंध विद्वत्तापूर्ण ग्रंथ प्रकाशित करणारी ब्रिटनमधील जगद्विख्यात प्रकाशन संस्था ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने गॉडस् गेटवे (God's Gateway) ह्या शीर्षकाने छापला आहे. लॉचेफेल्ड यांनी आपले पदवी पर्यंतचे (बी.ए.) शिक्षण कोलगेट विद्यापीठ, पदव्युत्तर पदवीचे (एम.ए.) शिक्षण वॉशिंग्टन विद्यापिठातून घेतले; तर तत्त्वज्ञान निष्णात (एम्.फिल.) व विद्यावाचस्पती (पी.एचडी.) कोलंबिया विद्यापीठातून पूर्ण केली आहे. ह्या सर्व शिक्षण संस्था अमेरिका ह्या देशात असून त्या उच्च दर्जाचे शिक्षण देण्यासाठी प्रसिद्ध आहेत. वाचकांनी लॉचेफेल्ड यांची पुस्तके जरूर वाचावीत. त्यांचा हिंदू धर्माप्रमाणेच बौद्ध धर्म परंपरा, शीख धर्म परंपरा तसेच संस्कृत व हिंदीचा गाढा अभ्यास आहे. १९९९ पासून प्राध्यापक लॉचेफेल्ड हे कार्थेज (Carthage) ह्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा चमू घेऊन भारतात येतात व येथील धर्म परंपरांचे त्यांच्या विद्यार्थ्यांना आकलन करून देतात व अभ्यास करतात. ह्या अभ्यास करण्याच्या पद्धतीला संक्षिप्तपणे जे. टर्म (J. Term) असे म्हटले जाते व जे-टर्मचा अर्थ 'जानेवारी टर्म' हा होय. कार्थेज हे अमेरिकेच्या विसकॉन्सिन (Wisconsin) ह्या राज्यातील केनोशा (Kenosha) येथील १८४७ साली स्थापन झालेले उदारमतवादी कला व विज्ञान ह्या क्षेत्रातील विषयांच्या अभ्यासासाठीचे प्रसिद्ध महाविद्यालय होय. केनोशा हे ठिकाण मिशिगन ह्या अतिशय सुंदर व मोठ्या तळ्याच्या कडेला असलेले अमेरिकेतील नयनरम्य ठिकाण आहे.

वाचकांनी जेम्स लॉचटेफेल्ड यांचे लिखाण नक्की वाचावे. सरते शेवटी 'हर हर महादेव' व 'हरी ॐ' म्हणून हिंदू धर्मियांच्या शिव व विष्णू ह्या दोन अतिशय प्रिय देवतांच्या हरद्वार (हरिद्वार) या नगरीस मानस प्रणाम करून पूर्णविराम द्यावासा वाटतो.

**संदर्भ :**


• इंडिया : अ सेक्रेड जॉग्रफी : डायना एल. येक

• बनारस : द सिटी ऑफ लाईट : डायना एल. येक

• वन इंडिया वन पीपल (नियतकालीक) ऑगस्ट २०१६ अंक (लेखाचे शीर्षक : हरिद्वार : द होली टाईम वार्प - लेखक- गुस्तास्प व जेरु इराणी)




**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com


# भारती फॅन्टसी : भारतीय इंग्रजी कादंबरीचे बदलते संदर्भ

*भारतीय इंग्रजी कादंबरीचे बदलते संदर्भ या लेखात विशद केले आहेत – संपादक*

भारतात 'इंग्रजी भाषा' ही परकीय भाषा राहिली नसून ती लेखकांच्या संवेदना मुखरीत करणारी एक साधनभूत भाषा बनली आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतीय इंग्रजी साहित्याचा पाया राजाराव, आर. के. नारायण व मुल्कराज आनंद या तिघांनी समर्थपणे घातला. पुढे अरुण जोशी, निराद चौधरी, अनिता देसाई, कमला मार्कंडेय इत्यादी लेखकांनी भारतीयांच्या इंग्रजी कादंबरीला साज चढवला.




१९८० साली प्रसिद्ध झालेल्या सलमान रुश्दिच्या 'मिडनाईट चिल्ड्रेन' या कादंबरीने एकूणच इंग्रजी कादंबरीची संहिता व समीक्षा या दोन्ही बाबींना छेद देत 'मॅजिक रिॲलिझम' या संप्रदायाचा पाया घातला. या कादंबरीला 'बुकर प्राईझ'सह मानाचे बरेच पुरस्कार मिळाले आणि या दशकापासून इंग्रजी कादंबरीने कात टाकली. ब्रिटिशांना व युरोपिअन राष्ट्रांना एका वेगळ्या व बदलत्या भारताचं दर्शन या दशकानंतर लिहिलेल्या कादंबऱ्यांनी करून दिले. १९९७ साली अरुंधती रॉय या भारतीय इंग्रजी लेखिकेची 'द गॉड ऑफ स्मॉल




थिंग्स्' ही कादंबरी प्रकाशित झाली व त्या वर्षीचा मॅन बुकर पुरस्कारही तिला मिळाला. या कादंबरीतून बदलता भारत, बदलते वातावरण, बदलत जाणारी पुढच्या पिढीची मानसिकता इत्यादी प्रश्नांना हात घातला गेल्यामुळे भारत हा केवळ 'गारुडी व गरीबांचा देश' (Snakescharmer's Country) ही पश्चिमेकडच्यांची भारताकडे पाहण्याची दृष्टी बदलली. १९९० साली

झालेल्या अनेक आर्थिक सुधारणांमुळे नवमध्यम वर्गाची निर्मिती झाली. हा तरुण वर्ग कॉलसेंटर, आय.टी, कॉर्पोरेट ऑफीस इत्यादी चकचकीत वास्तुंमध्ये काम करू लागला. पर्यायाने इंग्रजी भाषेच्या वापरात आमुलाग्र वाढ झाली. इंग्रजीमध्ये प्राथमिक शिक्षण देण्याकडे कल वाढला व या सहस्त्रकाच्या सुरुवातीला (२००० साली) इंग्रजी येणारा व हाताशी पैसा असलेला एक मोठा वाचकवर्ग तयार झाला. के. गुलाब यांनी हिंदुस्थान टाईम्सच्या एका अंकात लिहिलेल्या लेखात म्हटलं :

Generation 3 speaks English their own way. They have experience that are unique to them and come of age in ways that are different from their age group in other countries. Naturally Genration 3 wants books that make sense to them-books by Indian writen set in India.

या साहित्यिक परिप्रेक्ष्यात चेतन भगत सारखा लेखक कॉर्पोरेट व आयआयटी मधील तरुणाईच्या प्रेमप्रकरणांचा तडका देत अनेक कादंबऱ्या लिहित होता. शोभा डे सारखी लेखिका चित्रपट, मॉडेलिंग व उच्चभ्रू वर्गातील रंगीबेरंगी आयुष्यावर लिहित राहिली. चिक लिट, क्रिक लिट, अर्बन नरेटिव्ह आदी व्यावसायिक धरतीवर लिहिलेल्या साहित्याची मोठ्या प्रमाणात वाढ होत गेली. एस. गुप्ता यांनी 'इकॉनॉमिक्स व पॉलिटिकल विकली' मध्ये 'Indian Commercial Fiction in English' हा लेख लिहिला त्यात ते म्हणतात –

"Literary Fiction is the respectable public face of Indian Literature in English abroad and at home, white commercial fiction is the gossipy cafe of Indian writing in English at home" EPW (2012:46)

गुप्ता सध्याच्या भारतीय इंग्रजी साहित्याचे दोन प्रकार पाडतात. एक व्यावसायिक व दुसरा साहित्यिक. हा काहीसा वेगळा विचार वाटतो. २४ जानेवारी २०१० च्या दे ऑब्झर्वर' मध्ये आर मॅकक्रम यांनी 'चेतन भगत : द पेपरबॅक किंग ऑफ इंडिया' या लेखात नवीन मध्यम वर्गातील वाचकवर्गाचे वर्णन केले आहे.

This new middle class audience-small entrepreneurs, mangers, travel agents, sales people, secretaries, clerks has an appetite for literary entertainment that falls between the elite idiom of the antivated literarti, who might be familiar with the novels of Amitav Ghosh and Salman Rushdie and the Indian English of the street and the supermarket. Theirs is the Indian English the out sourcing generation.


हातात पैसा खुळखूळू लागला व थोडीशी आर्थिक सुबत्ता आली की मग माणसाला आपला इतिहास, संस्कृती, भाषा, कला इत्यादी गोष्टी जाणून घ्यायची इच्छा होते. भूकेला माणूस काव्यरस पिऊ शकत नाही व भूक जाळू लागली की चंद्र भाकर होत नसतो. या आर्थिकरित्या स्वावलंबी तरुणपीढीला आपल्या



संस्कृतीशी जोडण्याचं काम भारतीय इंग्रजी कादंबरी लिहिणाऱ्या नव्या दमाच्या लेखकांनी केले. यात महत्त्वाचं नाव ठरलं ते अमिश त्रिपाठी या लेखकाचं. १३ वर्षे सिंगापोरला बँकीग क्षेत्रात काम करणाऱ्या या उमद्या तरुणानं भारतीय पुराणकथा व 'शिव' या हिंदू

---

ज्याने आयुष्यात पावलोपावली दु:ख भोगलंय तोच नेहमी इतरांना हसवू शकतो,
कारण हसण्याची किंमत त्याच्याएवढी कुणालाच ठाऊक नसते.. !!




देवतेवर एक अफलातून कादंबरी २०१० साली लिहिली. तिचं नाव 'द इम्मॉर्टल्स ऑफ मेलूहा'. नंतर याच कादंबरीचा दुसरा व तिसरा भाग 'द सिक्रेट ऑफ नागाज' आणि 'द ओथ ऑफ वायुपुत्र' या नावाने प्रकाशित झाला. या 'शिवा ट्रायलॉजीने' प्रकाशन विश्वात नवनवे विक्रम रचले. २०१२ व २०१३ मध्ये सर्वाधिक खपाच्या लेखात तो पहिल्या पाचात राहिला. त्याच्या कादंबऱ्यांच्या विक्रमी खपाने हॅरीपॉटरलासुद्धा मागे टाकलं. सुनयना कुमार आपल्या 'द पाईड पाइपर ऑफ मेलूहा' या लेखात म्हणतात –

His (Amish's) publisher westland offers up sale figures for the new book, 3,50,000 copies presold compared with 2,40,000 for the last Hary Potter novel in India. You don't have to join too many dots to see that Amish is being marketed as our answer to J. K. Rowling.

रातोरात अब्जाधीश झालेला हा लेखक या कादंबऱ्याचं श्रेय 'भगवान-शिव' यांनी त्याच्यावर केलेल्या कृपेला देतो. हे थोडंस नवीन व प्रगत वाचकाला अतर्क्य वाटतं. पण प्राचीन भारताच्या इतिहासाचं अमिश त्रिपाठीच ज्ञान वाखाणण्या जोगं आहे. कुठल्यातरी प्राचीन आदिवासी टोळीतील एक बलवान पुरुष आपल्या कर्माने व पराक्रमाने 'शिव' या पदवीला पोचतो याचा एक वेगळा व नव्या शैलीत मांडलेला प्रवास थक्क करणारा आहे. त्याच्या कादंबरीतील भगवान शिव अगदी सहज इंग्रजी बोलतो व अमेरिकन पॉप्युलर सिरियल मधील नायकांसारखा वागतो. अमिश त्रिपाठी सोबतच आर. जी. मेनन, संहिता अर्णी, अशोक बनकर, रजत पिलाई, मैनाक धर, निलांजन चौधरी, अश्विन संघी, कविता काणे व देवदत्त पटनायक या लेखकांनी भारतीय पुराणकथांमधील कथांचा आधार घेऊन प्राचीन भारतातील संस्कृतीचे मोठे पट निर्माण केले. नवीन पिढीच्या भाषेत असल्यामुळे वाचकवर्गाने याला भरभरून प्रतिसाद दिला. या प्रकारच्या कादंबरी लेखनाच्या संप्रदायाला एम्मा डॉसन, या समिक्षिकेने 'भारती फॅन्टसी' असं नाव सुचवलंय. यामागे तिचा युक्तीवाद असा आहे की, या कादंबऱ्यांना 'फॅन्टसी' म्हटलं तर भारतीय पुराणं व महाकाव्य 'अवास्तव' व 'काल्पनिक' ठरतात. बहुतांश भारतीयांच्या मनात प्राचीन भारतीय शास्त्रांप्रति कमालीचा आदर असून 'रामायण','महाभारत' हा खरा इतिहास आहे असा मानणारा मोठा वर्ग भारतात आहे. याला 'हिस्टॉरिक फिक्शन' म्हणायचं की 'फॅन्टसी' म्हणायचं हा तिढा आहे. पण या नवीन संप्रदायाने भारतीयांच्या पुढच्या पिढीत सांस्कृतिक धरोहर संक्रमित करण्याचं मोठं काम केलं आहे.

एमा डॉसन आपल्या 'Celebrate at home : Post millennial Indian Fiction in English' या अत्यंत महत्त्वपूर्ण लेखात या कादंबऱ्यांनी प्रकाशन विश्वात केलेल्या विक्रमी खपाचा चिकित्सक अभ्यासक केला आहे. त्यांच्या मते या कादंबऱ्या 'For Sale in India only' असा मुखपृष्ठावर उल्लेख करून विकल्या गेल्या व याच्या लाखोप्रती खपल्या याचा अन्वयार्थ असाच लावता येईल की, पूर्वीप्रमाणे इंग्रजी कादंबऱ्या लंडन वा न्यू यॉर्क येथून प्रकाशित करण्याची गरज राहिली नसून भारतातच आता या लेखकांना खूप वाचकवर्ग व

रगड पैसा मिळतो. अमिशच्या 'Immortals of Mehula' या पहिल्या कादंबरीचे ब्रिटन व अमेरिकेत छापण्याचे अधिकार 'Quercus Books' या प्रथितयश प्रकाशनगृहाने कितीतरी मिलीयन अमेरिकन डॉलर देऊन २०१३ साली घेतले व 'वेस्टलँड पब्लिशर' या भारतीय प्रकाशन गृहाने अमिश त्रिपाठीला पुढील पुस्तक लिहिण्यासाठी काही मिलीयन अमेरिकी डॉलर ॲडव्हान्स म्हणून दिले. करण जोहरने नुकतेच त्याच्या कादंबरीवर चित्रपट काढण्याचे अधिकार विकत घेतले. देवदत्त पट्टनायकसारखा लेखक आपल्या पुस्तकांतून सर्वदूर परिचित झाला आणि सध्या 'एपिक' या चॅनलवर त्याचा देवलोक विथ देवदत्त पट्टनायक' हा कार्यक्रम हिट झाला आहे.

भारतीय पुराणकथा व प्राचीन भारतीय संस्कृतीची नवीन पिढीशी त्यांच्या भाषेत सांगड घालणाऱ्या या नवलेखकांच्या कादंबरींचा परिचय करून देणारं सदर 'दिशा'च्या वाचकांसाठी सुरू करण्याचा मानस आहे. यातून एक नवा वाचकवर्ग आणि नवा लेखकवर्ग यांची घट्ट वीण बांधली जाईल. तसेच भारतीय इंग्रजी कादंबरीने सहस्रकोत्तर (Post-mellennial) कालखंडात एका नव्या संप्रदायाचे सृजन केले असाही संदेश जाईल. एम्मा डॉसन म्हणतात -

"The Success of Tripathi's novels echoes the success of Roy's 1997 Booker Prize-winner, only conversely, the success has been generated and celebrated from within India and not from outside of it."

**- प्रा. प्रशांत धर्माधिकारी**
इंग्रजी विभाग,
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे

•••

(पृष्ठ क्र. १३ वरून...**मूल्यवेध-८: पुनर्नवीकरण**)

आज फिरुनी या सूर्यतरुखगांनीं, आपुलीया नवकान्ति-
पुष्प गानीं? ६

म्हणुनि कथितों नि:शंक मी तुम्हातें, असे सुन्दरता
अढळ जरी कोठें

तरी करी ती सृष्टींत मात्र वास, पहा, मोहिल सर्वदा ती
तुम्हांस. ७

केशवसुत १८८६, 'यथामूल आवृत्ती', १९६७, पृ.११

म्हणूनच, सृष्टीच्या पुनर्नवीकरणाच्या अपार सामर्थ्याचा आपणही अंगिकार करावा आणि रोजच्याच जीवनात, रोजच्याच घटनांतून, अंतःस्फूर्तीचे सदैव पुनर्नवीकरण करत रहावे हेच उत्तम! हाच आजच्या युगाचा मौलिक संदेश आहे.

**संदर्भ**

१. ऊर्जेच्या शोधात, आत्मचरित्र-डॉ.प्रियदर्शिनी कर्वे, राजहंस प्रकाशन, २००७, मूल्य रू.१६०/- फक्त, पृष्ठसंख्या-१७०.

२. इस्रो'ने भारतीय सैनिक आणि युद्धयंत्रणेच्या पाठीशी उभी केली एक विलक्षण ताकद (ISRO in service of the Indian soldier, Indian war machine) http://economictimes.indiatimes.com//articles/54638711.cms

३. अढळ सौन्दर्य, केशवसुत,
http://keshavsut.com/keshaindex. php?option=comšcontentview=sectionlayout=blogid=14Itemid=95

**- नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

# अहो शब्दराजे, ऐका!

*'अहो शब्दराजे, ऐका!' या कहाणीद्वारे लेखकाने शब्दांबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत - संपादक*

१७ मे  या शुभदिवशी माधव ज्यूलियन या कविराजाने 'मराठी असे आमुची मायबोली। जरी आज ती राजभाषा नसे।।' असे दुःखाने उद्गार काढले होते. 'जगन्मान्यता हिस अर्पू प्रतापे।' असेही भविष्य वर्तविले होते. ते भविष्य खरे होऊ नये म्हणून अनेक नतद्रष्ट व्यापाऱ्यांनी राजकारण केले. मायबोलीची थोर संपत्ती उपेक्षेमुळे गेली काळसागराच्या तळाशी, पुढे 'देवोत देतील तेव्हा जगातील भाषा हिला खंडणी।' असेही म्हटले असले, तरी खंडणी देणारे आणि घेणारे कोण आहेत, हे काय मायबोलीच्या बोलघेवड्या विद्वानांना ठाऊक नाहीए?

ऐका शब्दराजे, तुमची कहाणी! आटपाट नगर होते. तिथे एक राजा होता. त्याला अनेक भगिनी होत्या. त्यांच्यात दोन मुख्य होत्या. एक आवडती, दुसरी नावडती. आवडतीचे तो खूप लाड करायचा. नावडतीच्या लक्तरांची मात्र लाज नव्हती, म्हणून नावडतीला वैभवाच्या शिखरावर बसविणे या जन्मी तरी शक्य नव्हते. तिला राजवैभव नसल्याने सगळे भिकारीण म्हणून तिरस्कार करायचे. तिला जेवायला उष्टे, नेसायला जाडेभरडे, राहायला झोपडपट्टी, चाळ दिली. कचरा वेचायचे रजाने तिला काम दिले.

पुढे कमाल झाली. राजेशाही बुडाली. लोकशाही नावाची राणी गादीवर बसली. नावडतीला चांगले दिवस येतील. माधव ज्युलियन यांनी म्हटल्याप्रमाणे 'यशाची पुढे दिव्य आशा असे', एवढेच नाही तर 'जरी पंचखंडांत ही मान्यता घे, स्वसत्ताबळे श्रीमती (सौभाग्यवती नव्हे बरे!) इंग्रजी!' असेही म्हटले. नावडत्या मायबोलीची महती गाताना लोकप्रतिनिधी सुखावले.

पुढे कायदे झाले. नावडतीचे प्रभावी रूपलावण्य पाहून भाषाभगिनी अप्सराही फिक्या पडू लागल्या. नावाडतीला उंची हिऱ्यामोत्यांचे दागिने साहित्यविश्वात कोण घालणार? या प्रश्नाचे उत्तर शोधायला विद्वान कामास लागले. राजेशाहीत खंगलेली, पारतंत्र्यात भंगलेली नावडती धनहीन झाली होती. अखेर कायद्याने तिला तळागाळातून वर काढले आणि तिच्या एकेका रत्नाचा तिला अहेर करून तिचे पांग फेडले.

नावडतीला प्रसन्न करण्यासाठी ११ जानेवारी १९६५ रोजी महाराष्ट्र राज्याची राजभाषा म्हणून मान्यता मिळाली, जणू नावडतीला विकासाची सनदच मिळाली. शासनाने संचालनालय स्थापन केले. अहाहा, व्याप वाढत गेले. खूप वाढत गेले.

२०१० मध्ये महाराष्ट्र राज्य स्थापनेला ५० वर्षे झाली, पण नावडतीला व्यवहारात महती काही वाढली नाही, हे लोकप्रिय लोकशाहीराणीच्या दरबारी अधिकाऱ्यांच्या लक्षात आले. मग अनेक वर्षे आवडती राजरोसपणे देशभर हातपाय पसरत होती. अचानक लोकशाहीच्या मक्तेदारांना जाग आली. २०१४ मध्ये पुढील २५ वर्षांसाठी भाषाविषयक धोरण-मसुदा त्यांनी केला. त्याचे काय झाले? www.maharashtra.gov.in आणि 'मराठी भाषाविभाग' या संकेतस्थळावर जावे. उत्तर शोधावे.

कुसुमाग्रजांनी म्हटले आहे :'इंग्लिश ही ज्ञानाची खिडकी आहे, पण ती हवेत बांधता येणार नाही. आधी मराठीने घर पक्के बांधावे, मग त्याच्या दाराखिडक्यांची व्यवस्था करावी. भक्कम घराचा आधार 'निवारा'

असला, तरी त्यात भरपूर मोकळी हवा नको? उजेड, पाणी नको? माणूस निरोगी राहावा. जिवंत राहावा. आनंदाने जगावा, हीच तत्त्वे भाषेला लागू आहेत.'

अखेर नावडती गेली ग्रामीण भागात. तिथे तिला इतर भाषाभगिनी भेटल्या. हिन्दी, गुजराती, कानडी, तमीळ, तेलगू नावडतीने प्रश्न केला,

''बाई, बाई! कुठं जाताहात?''

''सरस्वतीच्या मंदिरी जातो. अक्षरांची अक्षता वाहतो.''

''त्यानं काय होतं?''

''मातेची भक्ती होते. इच्छित कार्ये सिद्धीस जातात.''

''आणखीन काय होतं?'' नावडती प्रफुल्ल झाली. जन्माची उदासीनता गेली.

''नावडती माणसं आवडती होतात.'' हिन्दी म्हणाली.

''वडिलधारी माणसं प्रसन्न राहतात.'' गुजरातीने खुलासा केला.

''तू कुणाची कोण?'' बंगालीने प्रश्न केला.

''मी राज्याची नावडती भाषा!'' मराठीने हुंदका दाबला, तरी अश्रूंचा पूर थोपविता नाही आला. तिने आपल्या मनातला भाव सांगितला, ''मी येऊ सोबत?''

ती त्यांच्याबरोबर देवळात गेली.

नागालॅन्डची नागकन्या आणि हिमालयातली संस्कृत देवकन्या वसा वसू लागल्या.

नावडतीने कुतूहलाने विचारले, '' काय गं भाषांनो, कोणता वसा वसताय?''

''आम्ही शब्दमुठीचा वसा वसतोय.''

''त्या वशाला काय करावं?''

''सारी अक्षरं घ्यावीत. त्यांचे सुंदर शब्द गुंफावेत. त्या शब्दांची कथा, कविता, कादंबरी करावी. न जमल्यास मूठभर शब्दांनी प्रार्थना करावी, कागद-लेखणी घ्यावी. सुपारी दान करून शपथ घ्यावी. दोन पाने विचारांची घ्यावीत. मनोभावे पूजा करावी. मनात करुणा भाकावी,'' ज्ञानदेवी, मायबोली! माझी शब्दमूठ शारदामाते! सत्ताधाऱ्या, सरकारी अधिकाऱ्या परप्रांती उपऱ्या, इंग्लिश माध्यमांच्या शाळकऱ्या, शेजाऱ्यापाजाऱ्या मराठी नावडती आहे, ती आवडती कर गं शारदे!'' असे विनम्रभावे म्हणून अक्षरांच्या अक्षता वाहाव्यात. संध्याकाळपर्यंत मातृभाषेत बोलावे, लिहावे, वाचावे, आणिक ऐकावे. इतर भाषेत बडबड करू नये. हा उपवास नाही निभवला तर निमुटपणे मौनात जावे. हा वसा आयुष्यभर करावा. शब्दमूठ इतरांना वाहण्यास सांगून नावडतीचे ऐश्वर्य घरोघर पोहोचवावे.

पहिल्या दिवशी नावडतीला नागकन्या, देवकन्या यांनी पूजासाहित्य दिले. दुसऱ्या दिवशी तिला धरून आणायला सांगितले.

त्याप्रमाणे नावडतीने मनोभावे पूजा केली. सारा दिवस घरोघर फिरली. शब्दमूठ वाटून थकली. उपवास करून भूक लागली. एक पुस्तक नाही. साधी नवकवितासुद्धा नाही. निदान शुद्ध मराठीतली एक चारोळीही नाही.

जावा-नणंदांनी उष्टीमाष्टी पाने दिली. तिने ती भ्रष्ट अभिमान्यांना वाटली. सरस्वती आराधना केली. छोटीशी एक रुपककथा वाचून झोपली.

पुढे तिसरा दिवस उगवला. नावडतीने सर्व पूजासाहित्य भाषा संचालनाकडून मागवले. ती ग्रंथालयात गेली. मनोभावे पुस्तकांची पूजा केली.

''शब्दा, शब्दा! राजाधिराजा, सासू-सासऱ्या, दीरा-भावा, नणंदा-जावा, भ्रतारा...नावडती आहे, ती आवडती कर रे देवा!'' असे म्हणून मुळाक्षरे वाहिली. बाराखडी अर्पण केली. सरस्वतीला पाढ्यांचे पेढे दिले. दिवसभर उपवास केला. एक अभंग तुकोबांचा! 'आम्हा घरी धन। शब्दांचीच रत्ने।।' वाचून झोपली.

(पृष्ठ क्र. २९ वर)

या हृदयीचे त्या हृदयी देता येते तोच खरा शिक्षक.

# सुलभा ब्रह्मेः एक लढाऊ पर्व

*ज्येष्ठ कार्यकर्त्या व अर्थतज्ज्ञ डॉ. सुलभा ब्रह्मे यांचे डिसेंबर २०१६ मध्ये निधन झाले. त्यांच्या कार्याची ओळख करून देणारा हा श्रद्धांजलीपर लेख - संपादक*

महाराष्ट्राच्या भूमीला विचारवंतांची खाण समजले जाते. डावे-उजवे, प्रतिगामी-पुरोगामी अशा सर्व विचारवंतांची परंपरा महाराष्ट्रात आहे. पण विचारात घेण्याजोगा मुद्दा म्हणजे या विचारवंतांच्या मांदियाळीत स्त्री-विचारवंतांची संख्या तुलनेत कमी आहे. साहजिकच, स्त्री विचारवंतांच्या कार्याचा तेवढा गौरवही होत नाही. त्यांचे कार्य 'नाही चिरा, नाही पणती' या गटात मोडते. म्हणूनच की काय, महाराष्ट्रातील ज्येष्ठ मार्क्सवादी, विज्ञानवादी स्त्री कार्यकर्त्या-विचारवंत सुलभा ब्रह्मे यांचे डिसेंबरमध्ये निधन झाले. पण समाजाने आणि माध्यमांनीही या घटनेची म्हणावी अशी दखल घेतल्याचे दिसले नाही.

सुलभा ब्रह्मे यांची ओळख-ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, मार्क्सवादी विचारवंत, सामाजिक चळवळीतील अग्रणी व पुरोगामी विचारवंत अशी. समाजविज्ञान, कृषी, लोकचळवळी, लोकसहभाग, आर्थिक विकास अशा अनेक क्षेत्रांत त्यांचे कार्य मोलाचे आहे.

सुलभा ब्रह्मे या श्रेष्ठ अर्थतज्ज्ञ व नियोजन आयोगाचे माजी उपाध्यक्ष डॉ. धनंजय गाडगीळ आणि सामाजिक कार्यकर्त्या सौ. प्रमिला गाडगीळ यांच्या कन्या. त्यांच्याकडून त्यांना सामाजिक कार्याचे संस्कार मिळाले. त्यांच्यावडिलांच्या कार्याचा त्यांच्यावर प्रचंड प्रभाव होता. संस्कारक्षम वयात त्यांनी त्यांचे वडील धनंजयराव गाडगीळ व सहकारमहर्षी वैकुंठभाई मेहता यांनी रुजवलेली सहकार चळवळ महाराष्ट्रात बहरास येताना पाहिली व त्या चळवळीचा आणि वैकुंठभाई मेहतांचा उतरता काळही पाहिला. या घटनांचा त्यांच्या संवेदनशील मनावर परिणाम घडून आला व त्यांच्या भविष्यातील कार्याची दिशा निश्चित झाली. ब्रह्मे यांचे प्राथमिक शिक्षण पुण्याच्या हुजूरपागा शाळेत झाले व पदवीचे शिक्षण त्यांनी स. प. महाविद्यालयातून घेतले.

पदव्युत्तर शिक्षण व विद्यावाचस्पती या पदव्या त्यांना गोखले अर्थशास्त्र संस्थेकडून मिळाल्या व तेथेच त्यांनी अध्यापकीय व प्रशासकीय काम केले. अभिजनांसाठी असलेल्या या संस्थेत काम करूनही ब्रह्मे यांची समाजाशी व सामान्यांशी असलेली नाळ कायम राहिली. या संस्थेत काम करताना त्यांनी -

१. मराठवाड्याच्या प्रादेशिक विकासाचा आराखडा.

२. पश्चिम महाराष्ट्रातील जमिनीचा वापर.

या दोन विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या विषयांवर अहवाल लिहिले. या अभ्यासपूर्ण मांडणीतून पुण्याच्या बुद्धिजीवी वर्गात सुलभा ब्रह्मे यांचा मान वाढला. या बौद्धिक योगदानाशिवाय ब्रह्मे यांचे संस्थात्मक कार्यही तितकेच महत्त्वाचे आहे. लोकविज्ञान संघटना, महाराष्ट्र दुष्काळ निवारण व निर्मूलन मंडळ, पुरोगामी महिला संघटना, लोकायत, जागतिकीकरण विरोधी कृती समिती, बायजा ट्रस्ट अशा कितीतरी सामाजिक संस्थांची स्थापना त्यांनी केली आणि लोकचळवळीचा पाया मजबूत केला. याशिवाय, त्यांनी 'शेतकरी जात्यात', 'खरे दहशतवादी कोण', 'क्युबाचा झुंजार क्रांतीलढा', 'कोकणचा विकास की विनाश' अशा विविध विषयांवर ५० पेक्षा अधिक पुस्तिका प्रकाशित केल्या. कोकण प्रांतात शाश्वत कृषीविकास होण्यासाठी विविध प्रयोग केले. अगदी

अलीकडे जैतापूर आण्विक प्रकल्पाला विरोध करणाऱ्या आंदोलनातही त्यांचा सहभाग होता. त्यांनी आपले बंधू व ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांच्या बरोबर पर्यावरण विकासासाठी देखील काम केले. सुलभा ब्रह्मे यांनी पुण्यात स्थापन केलेले 'समाज विज्ञान ग्रंथालय' हे पुण्याच्या डाव्या, पुरोगामी व धर्मनिरपेक्ष विचारांचे केंद्र बनले. शाश्वत आर्थिक विकास, पेटंट कायदा, पर्यावरण, सेंद्रिय शेती, लोकाधिकार-लोक सहभाग यासाठी सुलभा ब्रह्मे यांनी प्रामाणिक लढा दिला. त्यांचे लोक-चळवळीचे कार्य अखेरच्या श्वासापर्यंत चालू होते. 'विमुद्रीकरणाचा सामान्यांवर होणारा परिणाम' हा त्यांचा मृत्यूपूर्वी लिहिलेला शेवटचा लेख. प्रस्थापितांकडून वंचितांवर होणारा अन्याय, शोषण या विरुद्ध त्यांनी वैचारिक व कार्यात्मक असा सक्रिय लढा दिला. त्यांचे योगदान अमूल्य ठरते. कारण,

१) प्रस्थापितांच्या विरोधात व जनसामान्यांसाठी त्यांनी घेतलेली भूमिका व स्वतःच्या कार्यावरील अविचल निष्ठा.

२) त्यांचे सर्व लिखाण हे मराठी भाषेतून प्रकाशित करण्यासाठी घेतलेली आग्रही भूमिका. यातून त्यांची स्वतःच्या भाषेवरची निष्ठा तर दिसून येतेच पण त्याशिवाय, पेटंटसारख्या विषयावर माहितीपर साहित्य मराठीत निर्माण व्हावे ही कळकळ देखील दिसून येते.

३) कुठल्याही विषयावर तथ्यात्मक विश्लेषण करून दर्जेदार, लिखाण करणे हे त्यांचे वैशिष्ट्य.

ब्रह्मे यांनी समाजातील ज्वलंत विषयांना वाचा फोडून जनसामान्यांमध्ये जागृती घडवली. एवढेच नव्हे. तर त्या लोकांसाठी लोकांबरोबर उभ्या राहून लढल्या. त्यांनी त्यांचे विचार केवळ कागदावर नाही तर कृतीत उतरवले. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्रातील लोक चळवळीची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या कार्यातूनच जर त्यांच्या चळवळीला वारसदार निर्माण झाला तरच ही लोकचळवळ भविष्यात अखंड राहील. अन्यथा या मूल्यांचा इथेच ऱ्हास होईल. म्हणूनच, त्यांच्या कार्याची व त्यांनी निर्माण केलेल्या मूल्यांची दखल समाजाला घ्यावीच लागले. सुलभा ब्रह्मे यांच्या कार्याला 'लाल सलाम' व त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**- प्रा. अपर्णा कुलकर्णी**
सेंट झेवियर्स महाविद्यालय, मुंबई
भ्रमणध्वनी : ७७६८०२७६५८

●●●

(पृष्ठ क्र.२७ वरून - **अहो शब्दराजे, ऐका!**)

चौथ्या दिवशी घरातल्या लोकांनी विचारले, ''तुझा देव कुठं आहे?''

''माझा देव माझे शब्द आहेत. ते माझ्या अंतरात आहेत. तुमच्याही ते ओठांवर खेळू लागतील, तुम्ही वसा घेतला तर!''

तिने सांगितले तसे सर्वांनी केले. सर्वांना शारदा प्रसन्न झाली. सुनेमुळे शब्दराजे भेटले म्हणून सर्वांनी नावडतीची पूजा केली. दिंडी काढून, तिला पालखीत बसवून ती गल्लीगल्लीत फिरवली. नावडती होती, ती आवडती झाली. जसे तिला शब्द प्रसन्न झाले, तसे तुम्हा आम्हा होवोत. ही साठा उत्तरांची कहाणी पाचा उत्तरी सुफल संपूर्ण.

मर्ढेकर धार्मिक विनवणी करतात. तशी आपणही करू या -

**'अहो शब्दराजे ऐका, 'लाज सेवकाची राखा!'**

**- अरविंद दोंडे**
१०२, श्रीहरी सोसायटी, साकेत पथ,
कान्होजी आंग्रे, व्यायामशाळेजवळ,
बाळकुम-१, ठाणे (प)-४०० ६०८
भ्रमणध्वनी : ९८१९१९५५९२
Email :arvinddode@gmail.com

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभाग

१५ जून २०१६ रोजी विद्या प्रसारक मंडळाचे पटांगण नवचैतन्याने ओसंडून वाहात होते. निमित्त होते बालवर्ग सुरू होण्याचे. शिक्षक, पालक, मुलं यांच्या शालेय वर्षाचा शुभारंभ झाला होता. लहान व मोठ्या शिशुच्या वर्गाची पताका व फुगे लावून सजावट करण्यात आली होती. शिवाय गोळ्या वाटून त्यांच्या आनंदात भर घालण्यात आली.

लहान व मोठ्या शिशु विभागात विविध उपक्रम, सण, स्पर्धा, खेळाच्या माध्यमांतून आनंददायी शिक्षणातून साजरे केले जातात. या सर्वांची ओळख व नियम यासाठी दरवर्षी पालक सभेचे आयोजन केले जाते.

आपला सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी वर्षभरात येणारे सण साजरे करून बालरूपी रोपट्यावर शुभसंस्कार केले जातात. यात आषाढी एकादशीला बालपंढरी दिंडी साजरी केली. गुरू-शिष्यांचे महत्त्व समजण्यासाठी गुरुपौर्णिमा साजरी केली. दीपपूजेनिमित्त सर्व जुन्या व नव्या दिव्यांचे पूजन करून दीपपूजा साजरी करण्यात आली. नागपंचमीला नागाचे वारूळ करून सणांचे महत्त्व सांगण्यात आले. भाऊ बहिणीच्या पवित्र नात्यांचा सण रक्षाबंधन मुलींनी मुलांना राखी बांधून साजरा करण्यात आला. कृष्णाच्या वेषातील मुलांनी दहिहंडी फोडून दहिहंडीचा सण साजरा केला. तर पर्यावरणाचे महत्त्व बालमनावर उमटविण्यासाठी शाडूची गणपतीची मूर्ती आणून गणेशोत्सव सण साजरा करण्यात आला.

अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात 'दीपावली' हा सण साजरा करण्यात आला. वर्गावर्गातून कंदील लावून, दारापुढे रांगोळ्या काढून, मातीचा किल्ला बनवून हा सण साजरा करण्यात आला. मुलांना लाडू, चिवडा, फराळ म्हणून देण्यात आला. ध्वनी प्रदूषण होऊ नये म्हणून आवाज विरहीत फटाके वाजवण्यात आले.

मुलांना फक्त पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्ष कलाकृतींचे ज्ञान मिळावे यासाठी 'आकार, आहार व रंग सप्ताह' यांचे आयोजन करण्यात आले. आहार सप्ताहात फळभाज्या, पालेभाज्या, उसळी, कोशिंबिरी या सर्वांची ओळख करून मुलांना डब्यात आणावयास सांगितल्या होत्या. आकार सप्ताहात गोल, त्रिकोण, चौकोन, आयत अशा विविध वस्तूंचे प्रदर्शन मांडून विविध आकारांची ओळख मुलांना करून देण्यात आली. तर लाल, पिवळा, निळा, हिरवा व पांढऱ्या रंगांचे प्रदर्शन भरवून त्या रंगाची ओळख करून दिली.

**क्रीडामहोत्सव :** दरवर्षीप्रमाणे यंदाही मुलांच्या क्रीडास्पर्धा घेण्यात आल्या.

**शालाबाह्य स्पर्धा :** कलाचिल्ड्रेनतर्फे घेण्यात आलेल्या रंगभरण स्पर्धेत १० मुलांना सुवर्णपदक तर कु. स्वरूप संजय लांजेकर यास कलाकृती ॲवॉर्ड व कु. श्रेया दिनेश नागले हिला कलागौरव ॲवॉर्ड मिळाले. अभिमानाची गोष्ट म्हणजे यंदा पूर्व प्राथमिक विभागाला ॲक्टिव्ह स्कूल ॲवॉर्ड हा मानाचा पुरस्कार मिळाला.

**स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण समारंभ :** मुलांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम साजरा करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे यंदाही आमच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणी कु. आदिती मयुर गोडसे हिला बोलावले होते. तिची संपूर्ण गीता पाठ असून श्रीसूक्त, रामरक्षा इ. बरेच श्लोक तोंडपाठ आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्षपद मंडळाचे सभासद श्री. अनिरुद्ध जोशी यांनी भूषविले होते.

दरवर्षीप्रमाणे यंदाही आमच्या मुख्याध्यापिका मा. विदुला वैद्य बाईंनी आम्हांला स्नेहसम्मेलनासाठी 'रामायण' हा विषय दिला होता. त्यातील काही निवडक गाणी १) कुशलव रामायण गाती, २) आनंद सांगू किती, ३) सेतू बांधा रे ४) राम जन्मला ग सखी. विशेष कौतुकास्पद गोष्ट म्हणजे लहान व मोठ्या शिशुतील मुलांची ही सर्व गाणी पाठ झाली.

**अल्पोपहार** : श्रमपरिहारानिमित्त मुलांना दाबेली व मावा केक असा अल्पोपहार देण्यात आला.

अशाप्रकारे विद्या प्रसारक मंडळाचे सहकार्य, पालकांचे मोलाचे सहकार्य, मुख्याध्यापिका यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मुलांवर उत्तम संस्कार करीत असतात.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, प्राथमिक विभाग

### वृक्षारोपण व वृक्षदिंडी

२१ जून २०१६ ते १ जुलै २०१६ या वनमहोत्सव कालावधीत शाळा स्तरावर पालकसभा घेऊन वृक्ष लागवड व वृक्ष संगोपनाबाबत माहिती देण्यात आली. तसेच या उपक्रमाचे औचित्य साधून वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनासंबंधी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. तसेच इ.३री-४थीच्या विद्यार्थ्यांची 'वृक्षदिंडी' काढण्यात आली. तसेच 'झाडे लावा, झाडे जगवा', 'परिसर वाचवा, झाडे लावा, प्रदूषण टाळा' या प्रमाणे घोषवाक्यांचे फलक तयार करून घोष वाक्यांच्या गजरात शुक्रवार दि. १ जुलै २०१६ रोजी 'वृक्षदिंडी'चा कार्यक्रम पार पडला व शालेय परिसरात २१ रोपांची लागवड करण्यात आली.

### आषाढी एकादशी

विठू माझा लेकुरवाळा। संगे गोपाळांचा मेळा।।

या उक्तीप्रमाणे गुरुवार दि. १४ जुलै २०१६ रोजी डॉ. बेडेकर विद्या मंदिरातील प्राथमिक विभागाच्या प्रांगणात विद्यार्थ्यांची म्हणजेच इ. १ली ते ४ थी च्या 'बाल वारकऱ्यांची' दिंडी काढण्यात आली. बाल गोपाळांना आषाढी एकादशीची व दिंडीची माहिती सविस्तर सांगण्यात आली. विठ्ठल-रुक्मिणी नाम गजरात शालेय परिसर प्रसन्न व मंगलमय झाला होता. वारकरी संप्रदायाचा वारसा जपण्यासाठी शाळेतील बालगोपाळ वारकऱ्यांच्या वेशात हातात टाळ व चिपळ्या घेऊन सज्ज झाले होते. सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी या दिंडीत सहभाग घेतला.

### गुरुपौर्णिमा

जन्मानंतरचा आपला पहिला गुरू ही आपली 'आई' असते. आपल्या जडण-घडणीत अत्यंत मोलाचा असा तिचा वाटा असतो. त्यानंतर आपल्या कुटुंब व समाजातील इतर व्यक्तिंचाही त्यात समावेश असतो. तसेच शाळेत आपला भावनिक व मानसिक विकास घडवणारे आपले शिक्षकही आपले 'गुरू' असतात. त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आषाढ महिन्यातील पौर्णिमेला म्हणजेच १९ जुलै २०१६ रोजी व्यास पौर्णिमेला गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी या निमित्ताने गुरू-शिष्यांच्या विविध गोष्टी सांगितल्या. तसेच आपल्या सहवासात येणाऱ्या लहान-मोठ्या व्यक्तिंबरोबरच 'निसर्ग' हा देखील आपला फार मोठा गुरू आहे, पृथ्वीकडून सहनशीलता, वृक्षाकडून नम्रता, पाण्याकडून सतत पुढे वाहाणे व भेदभाव न करणे, पशु-पक्ष्यांकडून वाणीतील गोडवा इ. गुण आपण शिकत असतो अशी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

### बालचित्रपट

सोमवार दि. १ ऑगस्ट २०१६ रोजी लोकमान्य

टिळक पुण्यतिथीचे औचित्य साधून इ.१ली ते ४थीच्या विद्यार्थ्यांना 'I AM KALAM' हा बालचित्रपट दाखवण्यात आला. या चित्रपटातून जिद्द व चिकाटी असेल व पडतील ते कष्ट करण्याची तयारी असेल तर आपण आपले ध्येय नक्कीच साध्य करू शकतो, परंतु ध्येय हे नेहमी उच्च असावे असा धडा मुलांना मिळाला.

**रक्षाबंधन**

१६ ऑगस्ट २०१६ रोजी श्रावण महिन्यातील पौर्णिमा ही 'नारळी पौर्णिमा' म्हणून म्हणजेच 'रक्षाबंधन' म्हणून साजरी करण्यात आली. भावा-बहिणीच्या पवित्र नातेसंबंधाची मुलांना माहिती सांगण्यात आली व शाळेतील विद्यार्थ्यांकडून 'राखी' बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली व तयार केलेल्या राख्या एकमेकांना मोठ्या आवडीने बांधून घेण्यात आल्या. या निमित्ताने परस्परांचे रक्षण, एकता व समता या बद्दल मुलांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला व खाऊ देऊन हा सण साजरा करण्यात आला.

**श्री गणेशोत्सव**

सोमवार दि. ५ सप्टेंबर २०१६ व मंगळवार दि. ६ सप्टेंबर २०१६ रोजी मराठी माध्यम, इंग्रजी माध्यम सर्व विभागातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी एकत्र येऊन 'श्री गणेशोत्सव' साजरा केला. या निमित्ताने श्री गणपती अथर्वशीर्षाची आवर्तने विद्यार्थ्यांकडून करून घेण्यात आली. विशेष म्हणजे या वर्षापासून 'इकोफ्रेंडली' सजावट करून बालगणेशाची मूर्ती स्थापन करण्यात आली होती. दोन्ही दिवस यथासांग पूजा-आरत्या करण्यात आल्या. या निमित्ताने इ.१ली ते ४थीच्या विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' अशा जयघोषात बाप्पाला आनंदाने निरोप देण्यात आला.

**मनःशक्ती कार्यशाळा**

२३ जुलै २०१६ रोजी इ. १ली व २रीच्या पालकांसाठी मनःशक्ती या संस्थेतर्फे कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत मानवी जीवनात मनाचे स्थान काय आहे? त्याचा जीवनावर काय परिणाम होतो? त्यासाठी आपले आचार विचार कसे असावेत? काय बोलावे, काय बोलू नये? पालकांचे मुलांसमोरील वर्तन कसे असावे या बाबत मनःशक्तीचे साधक श्री. बापर्डेकर यांनी पालकांना मार्गदर्शन केले.

**वाचन प्रेरणा दिन**

अज्ञानाला आता टाळा,<br>
पुस्तकाचा ध्यास धरा<br>
वाचन संस्कृती घरोघरी<br>
तिथे फुले ज्ञानपंढरी।

या उक्तीनुसार शनिवार दि. १५ ऑक्टोबर २०१६ रोजी भारतरत्न 'माजी राष्ट्रपती व थोर शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम' यांचा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्यात आला. या निमित्ताने मुलांना वाचनाचे महत्त्व समजावून सांगून त्यांच्याकडून विविध पुस्तकांचे वाचन करून घेण्यात आले.

**शारदोत्सव**

१ ऑक्टोबर ते ११ ऑक्टोबर २०१६ या दरम्यान स्त्री-शक्तीचे महत्त्व विशद करणारा व शालेय जीवनात बुद्धी व ज्ञान देणाऱ्या 'सरस्वती देवीचा' घटना स्थापनेपासून विजया दशमीपर्यंत चालणारा शारदोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी इ.१ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांच्या चित्रकला, भेटकार्ड बनवणे, श्रुतलेखन व स्मरणशक्ती अशा विविध स्पर्धा घेऊन प्रोत्साहित करण्यात आले. तसेच हा सण साजरा करण्यामागील धार्मिक व सामाजिक हेतू विद्यार्थ्यांना

---

अखंड यशाने आपल्या जीवनाची केवळ एकच बाजू कळते. दुसरी बाजू कळण्यासाठी अपयशाची जरुरी असते.

समजावून देण्यात आला. या निमित्ताने मुला-मुलींचा भोंडला घेण्यात आला. सरस्वतीचे पूजन करून सामाजिक एकोपा व जिव्हाळा वाढवणारा शारदोत्सव आनंदाने पार पाडला.

### वार्षिक स्नेह संमेलन



प्रतिवर्षाप्रमाणे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा व त्यांचे कौतुक करावे म्हणून १३ डिसेंबर २०१६ रोजी विद्या प्रसारक मंडळाचे सहकार्यवाह मा. श्री. ज. ना. कयाळ यांच्या अध्यक्षतेखाली व श्रीमती निलाताई कोर्डे यांच्या उपस्थितीत वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. या स्नेहसंमेलनाचा 'कलास्वाद' हा प्रमुख विषय होता. या विषयाद्वारे लोककला व लोक संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या नृत्याविष्कारांचे सादरीकरण करण्यात आले व बक्षिसपात्र विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन प्रोत्साहित करण्यात आले.



## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

### उपक्रम

दिनांक १३ जानेवारी २०१७ रोजी आपल्या शाळेत मनःशक्ती केंद्रातर्फे 'विद्यार्थ्यांसंबंधी शिक्षकांना भेडसावणाऱ्या समस्या' ह्या विषयावर शिक्षकांना उत्तम मार्गदर्शन केले. हे व्याख्यान शिक्षक व पालक या दोघांच्याही दृष्टीने अत्यंत बोधप्रद व प्रेरणादायी झाले. तसेच त्यांच्या सहकाऱ्यांनी अनेक चांगली पुस्तके शिक्षकांना उपलब्ध करून दिली.

### शारदोत्सव

शारदोत्सवानिमित्त इ. ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'संदेशात्मक रांगोळी' स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत एकूण ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

- **अभिनंदन**

'लोकसत्ता सुवर्णलाभ' (२०१६-१७) ह्या योजनेत ठाणे व मुंबईतून आलेल्या एक लाखांहून अधिक प्रवेशिकांमधून निवडलेल्या एकूण पंधरा भाग्यवंत विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. त्यात आपल्या शाळेतील ज्येष्ठ शिक्षक दीपक धोंडे ह्यांना प्रथम क्रमांकाचे - कार हे बक्षीस प्राप्त झाले.

या दीपावली उत्सवानिमित्त असलेल्या योजनेत त्यांची स्वरचित कविता ही बक्षिसाचा मुख्य आधार ठरली.

सर्वांतर्फे दीपक धोंडे यांचे हार्दिक अभिनंदन!

दि. १ जुलै २०१६ ते १२ जुलै २०१६ व दि. १६ नोव्हेंबर २०१६ ते २२ नोव्हेंबर २०१६ या कालावधीत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, ठाणे मार्फत आयोजित केलेल्या 'निवड श्रेणी' प्रशिक्षणात आपल्या शाळेतील शिक्षिका सौ. संध्या झंझाड सहभागी

झाल्या होत्या. सदरचे प्रशिक्षण त्यांनी 'अ' श्रेणी संपादन करून पूर्ण केलेले आहे. सर्वांतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!

**सहली आणि शिबिरे**

दि. १५ ते १७ डिसेंबर २०१६ या कालावधीत इ. ९ वी, १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी सहल आयोजित केली होती. या सहलीत विद्यार्थ्यांनी औरंगाबाद, अजिंठा, वेरुळ, दौलताबाद, नाथसागर, एकनाथ महाराजांचा वाडा, बीबी का मकबरा, शनी शिंगणापूर इ. ऐतिहासिक स्थळांना भेटी दिल्या.

दि. ४ जानेवारी २०१७ रोजी इ. ६ वीच्या विद्यार्थ्यांसाठी सहलीचे आयोजन केले होते. या सहलीत विद्यार्थ्यांनी बदलापूर येथील 'आनंदसागर' या स्थळाला भेट दिली.

दि. १० ते १२ जानेवारी २०१७ या कालावधीत इ. ७ वी व ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी सहलीचे आयोजन केले होते. या सहलीत विद्यार्थ्यांनी प्रतापगड, प्रतिबालाजी, पांचगणी व महाबळेश्वर इ. स्थळांना भेटी दिल्या.



दि. २९ डिसेंबर २०१६ ते ४ जानेवारी २०१७ या कालावधीत म्हैसूर (कर्नाटक) येथे १७ वी राष्ट्रीय जंबोरीचे आयोजन करण्यात आले होते. यात आपल्या शाळेतील स्काऊट गाईड्स व मार्गदर्शक शिक्षक म्हणून सौ. कल्पना बोरवणकर व श्री. पांचाळ हे शिक्षक सहभागी झाले होते.




यात कॅम्प, क्राफ्ट, स्काऊट-गाईड कौशल्य, प्रथमोपचार, पायोनियर, मार्चपास्ट, बॅन्डपथक, सिग्नलिंग, कवायती, सांस्कृतिक कार्यक्रम, शोभायात्रा, फूडप्लाझा, ग्लोबल डेव्हलपमेन्ट, ॲडव्हेंचर गेम्स इ. स्पर्धांमध्ये स्काऊट-गाईडस्‌नी सहभाग घेतला व महाराष्ट्राला पारितोषिक मिळवून दिले.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**IPM 2016 (मेगा फायनल) गणित परीक्षेचा निकाल:**

राष्ट्रीय स्तरावर खालील मुलांनी उज्ज्वल यश प्राप्त केले व ते नगद बक्षिसाचे मानकरी ठरले :

| इयत्ता | नाव | क्रमांक |
|---|---|---|
| इ.५ वी | कु. ईशान फणसे | ६८ वा |
| इ.८ वी | कु. विश्वराज बोरकर | १८८ वा |

ब्राह्मण सेवा संघ आयोजित मराठी वक्तृत्व स्पर्धेत कु. श्रेया मोघे हिला प्रथम पारितोषिक मिळाले.

**क्रिडा : 7th Invitational Athletics meet मधे –**

१) ६० मि. रनिंग रेस मधे कु. गौरांग आचरेकरला तिसरे पारितोषिक मिळाले.

२) १५० ४ मि. रिले रेसमधे केदार हर्डिकर, हेतुल छडवा, अंकुर कुठवड आणि गौरांग आचरेकर यांना तिसरे पारितोषिक मिळाले.

मनात आणलं तर या जगात अशक्य असं काहीच नाही.

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

### मराठी विभाग

मराठी विभागाने आणि बीएमएम यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा साजरा केला.

बोली भाषेच्या जतनाच्या उद्देशार्थ प्रसिद्ध कवी गजानन पाटील, सर्वेश तरे आणि प्रकाश पाटील यांच्या संकल्पनेतून निर्मित झालेल्या 'आगरायन काव्य मैफली' या प्रयोग महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे आयोजित करण्यात आला होता.

बोलक्या बाहुल्यांचे खेळ करणारे रमेश भंडारी यांच्या बाहुल्यांनीही सुंदर विनोदी आगरी कविता सादर केल्या.

मैफलीची सांगता सर्वेश तरे यांच्या बोलीभाषा जतन करण्यासंदर्भाची 'बोली' ही प्रबोधनात्मक कवितेद्वारे झाली. या मैफलीत प्रसिद्ध चित्रकार मोरेश्वर पाटील तसेच चित्रपट निर्माते अंकुश सुतार हे देखील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह उपस्थित होत्या.

ज्येष्ठ मराठी विभागातर्फे भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त अभिनेते जयंत सावरकर यांना निमंत्रित करण्यात आले होते. महाविद्यालयातील विद्यार्थी पंकज चव्हाण याने जयंत सावरकरांची मुलाखत घेतली. त्यावेळी विविध प्रश्नांना त्यांनी दिलखुलास उत्तरे दिली. प्राचार्या डॉ. सिंग यांनी जयंत सावरकर यांचा नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार केला. प्रा. संतोष राणे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली, तर प्रा. राजश्री जाधव यांनी आभार मानले.

### संस्कृत विभाग

संस्कृत विभागातर्फे विद्यार्थ्यांची अभ्यासिका यात्रा आयोजित करण्यात आली होती. या अभ्यासिका यात्रेत प्रथम, द्वितीय, तृतीय वर्षांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

### इंग्रजी विभाग

महाविद्यालयातील इंग्रजी विभागाने 'चारशे वर्षानंतर शेक्सपिअरची पुनर्भेट' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले होते. या प्रसंगी डॉ. ए. जी. खान, डॉ. विजय बेडेकर, प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह, विभाग प्रमुख डॉ. प्रमोद खराटे आणि मान्यवर उपस्थित होते.

आजच्या काळात शेक्सपिअरची चर्चा करताना समोर येणारी आव्हाने आणि त्यातील बारकावे समजून घेण्याची आवश्यकता प्रतिपादित करून डॉ. खान यांनी आजच्या तरुणाईला शेक्सपिअरच्या कृतीकडे करता येण्याचे काही मार्ग सुचवले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. शकुंतला सिंह यांनी इंग्रजी विभागाचे अभिनंदन केले. व २०१८ मध्ये संपन्न होणाऱ्या चर्चासत्राची घोषणा केली. या समारंभाला विद्या प्रसारक मंडळाचे शंभरहून अधिक प्रतिनिधी उपस्थित होते. तसेच मुंबई व ठाणे विभागातील अनेक महाविद्यालयातील प्राध्यापकांनी या चर्चासत्रात आपले शोधनिबंध सादर केले. प्रा. नेहा मालखरे, प्रा. अर्चना नायर, प्रा. वेदवती परांजपे यांनी सूत्रसंचालन केले. तर डॉ. मनोज पाथरकर यांनी आभार मानले.

### हिंदी विभाग

हिंदी विभाग तसेच हिंदुस्थानी प्रचार सभा यांच्या विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 'भाषण स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. 'बच्चों के प्रति बढते अपराधों पर नियंत्रण कैसे?' या विषयावर विद्यार्थ्यांनी अतिशय उत्कृष्टपणे आपले विचार मांडले. दरवर्षीप्रमाणे यंदाही प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच विजयी वक्त्याला बक्षीस व प्रमाणपत्र

देण्यात आले.

प्रथम क्रमांक – नम्रता दुबे (३००० रु. रोख)

द्वितीय क्रमांक – शिल्पी सिंह (२००० रु. रोख)

तृतीय क्रमांक – उत्कर्षा पोवर (१५०० रु. रोख) प्रदान करण्यात आले.

डॉ. रीता कुमार, मनिषा पांडे, श्रीमती ज्योत्स्ना सिंह निर्णायक म्हणून उपस्थित होते. प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विभागप्रमुख डॉ. अनिल ढवळे व डॉ. जयश्री सिंह यांनी स्पर्धा यशस्वी होण्यास परिश्रम घेतले.

**जिमखाना विभाग**

महाविद्यालयाच्या जिमखाना विभागातर्फे आंतर महाविद्यालयीन क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. ठाणे, पालघर, नवी मुंबई, मुंबई या परिसरातील ७९ महाविद्यालयांनी या महोत्सवात सहभाग नोंदविला.तसेच विभागाने 'वार्षिक क्रीडा दिन' साजरा केला. महाविद्यालयाच्या अनेक विद्यार्थी खेळाडूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधून नावलौकिक मिळविला.

- गणेश महाले याने बॅडमिंटन मधून मुंबई विद्यापीठाचे पश्चिम विभागीय राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत प्रतिनिधित्व केले.
- हिमानी गावकर हिने ज्युडो तसेच
- प्रिती टिपले हिने जिम्नेस्टिकमध्ये मुंबई विद्यापीठाचे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत प्रतिनिधित्व केले.
- प्रिती टिपले हिने राष्ट्रीय स्पर्धेत रौप्यपदक जिंकले.
- हिमानी गावकर हिने ज्युडो या क्रीडाप्रकारात रौप्यपदक जिंकले.
- आशिष पांडे – हातोडा फेक – सुवर्णपदक
- किरण भारते – लांब उडी – सुवर्णपदक
- प्रांजली कुळकर्णी – कॅरम – सुवर्णपदक
- अक्षता कुळकर्णी – कॅरम – सुवर्णपदक
- प्रांजली गोखले – कॅरम – कांस्यपदक

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

**'Environment, health and Safety' या विषयीची एक दिवशीय राष्ट्रीय परिषद संपन्न**




**परिषदे दरम्यान सन्माननीय प्रमुख पाहुणे डावीकडून सौ. स्मिता खंडागळे (परिषद सचिव), श्री. विवेक वाणी (प्रमुख वक्ते), श्री. व्ही. एस. भाकरे (प्रमुख पाहुणे), श्री. जे. एन. कयाळ (जॉईन्ट सेक्रेटरी वि. प्र. मंडळ, ठाणे) व श्री. आर. आर. देवघरे (प्रमुख वक्ते), प्राचार्य दि. कृ. नायक वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन ठाणे**

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनतर्फे 'Environment, health and Safety' या विषयीची १९ वी एक दिवशीय राष्ट्रीय परिषद शनिवार दि. १७ डिसेंबर २०१६ रोजी पाणिनी हॉल, ठाणे कॉलेज कॅम्प्स येथे सकाळी १०.०० ते ५.०० या वेळेत पार पडली. परिषदेच्या शोधनिबंधाचे प्रकाशन सन्माननीय प्रमुख पाहुणे प्रा. व्ही. एस. भाकरे यांचे शुभहस्ते प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. त्यांनी २००२ सालापासून सुरु झालेल्या Industrial Safety अभ्यासक्रमाविषयीची माहिती उपस्थितांना करून दिली. अनेक Safety Officers

खरा आनंद म्हणजे जेव्हा तुम्ही दुसऱ्यांना आनंदी बनवून आनंदी होता.

Industry मध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्यांचा सार्थ अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले. ते सर्वजण माजी विद्यार्थी असल्याचेही त्यांनी नमूद केले. IT-Centre मधील स्टाफतर्फे Industrial Safety विषयी सातत्त्याने अशा परिषदा भरविल्याबद्दलही त्यांनी प्रसंगोद्गार काढले.

सदर परिषदेस प्रमुख वक्ते श्री. आर. आर. देवघरे (उप. संचालक, नॅशनल सेफ्टी कॉन्सिल, नवी मुंबई) हे उपस्थित होते. त्यांनी 'KYT-Hazard prediction Technique for zero Accident through zero Accident campaign' या विषयीचे उत्तम आणि महत्त्वपूर्ण सादरीकरण उपस्थितांना करून दिले. KYT-'A Japanese Hazard prediction technique for zero accident' यावर विशेष भर दिला. 'ते एक आदर्शवत अभियान असून मानवी जीवनाने त्याचा आदर करायला पाहिजे' असे त्यांनी आवर्जून सांगितले. कल्पना, पद्धती आणि सराव इत्यादी घटकांद्वारे 'शून्य अपघात अभियान' यशस्वी होते असेही ते पुढे म्हणाले.

जे. एन. कयाळ (जॉईण्ट सेक्रेटरी, विद्या प्रसारक मंडळ, ठाणे) यांनी अध्यक्षीय भाषण केले.

परिषदेची सुरुवात प्रार्थना गीताने झाली. परिषदेचे निमंत्रक आणि तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक यांनी मान्यवरांचे स्वागत केले. त्यांनी परिषद आयोजनामागचा उद्देश स्पष्ट केला व जीवनामध्ये सुरक्षिततेला अत्यंत महत्त्व असल्याचे सांगितले. 'त्यासाठी प्रत्येकास त्यासंदर्भातील शिक्षण मिळणे आवश्यक आहे. असुरक्षितेमुळे किती जणांचे आयुष्य आणि मालमत्तेचे नुकसान होत असते. म्हणून सुरक्षितेला प्राधान्य असले पाहिजे' असे सांगितले.

सदर प्रसंगी सर्व प्रायोजकांचा सत्कार करण्यात आला. सौ. एस. डी. खंडागळे (परिषद सचिव) यांनी सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

सदर परिषद ही दोन सत्रात पार पडली. पहिल्या सत्राचे कामकाज ए. के. कुलकर्णी (तज्ज्ञ सदस्य राष्ट्रीय सुरक्षा मंडळ, मुंबई) यांनी पाहिले व दुसऱ्या सत्राचे कामकाज रजनीकांत तेली (डायरेक्टर ॲन्ड सेफ्टी कन्स्ल्टंन्ट, Telly Safety Solutions Pvt. L td. Mumbai) यांनी पाहिले.

सदर परिषदेत सादर झालेले निबंध व वक्ते पुढीलप्रमाणे –

| अ.क्र. | निबंध सादरकर्ते | विषय |
|---|---|---|
| १. | डॉ. निलेश अमृतकर<br>मॅनेजिंग डायरेक्टर, एज्युफोर्स लॅब प्रा.लि.ठाणे | Environmental Monitorina for complience to EHS requirements |
| २. | श्री. प्रशांत कोकीळ<br>Chief sustainability officer, Mumbai,<br>The Tata Power Co. Ltd. Mumbai | Pollution in parts |
| ३. | डॉ. प्रमोद साळसकर, संस्थापक आणि सचिव<br>नौशाद अली सरोवर संवर्धिनी पवई, मुंबई | Strategy for conservation and Management of Urban lakes in Mumbai |
| ४. | डॉ. रवींद्र जैन<br>Occupational Health and Safety Consultant | Medical response for major accident hazard control in industry |

कठीण म्हणजे अशक्य होत नसतं. त्याचा फक्त एवढाच अर्थ होऊ शकतो की,
तुम्हाला थोडी जास्ती मेहनत घ्यावी लागेल.

| | | |
|---|---|---|
| ५. | डॉ. मोना गांधी, डायरेक्टर एज्युफोर्स, मुंबई | Rescue Mobile stretcher |
| ६. | श्री. लविश लोखंडे<br>Lead Fire & safety officer,<br>Zakum Development Company Abu Dhabi | Expectation from safety and health professionals in Oil and gas industry. |
| ७. | श्री. संजीव नायर, उप-जनरल मॅनेजर आणि हेड लॉजिस्टीकल सेफ्टी, अम्बुजा सिमेंट कंपनी | H & S transformation Journey of a Manufacturing Industry. |
| ८. | श्री. शौकत हक्यु, मॅनेजर ट्रेनिंग (प्रोप्रायटर) भारत सेफ्टी सोल्युशन, ठाणे | H & S Challenges & Solutions for Construction Industries in India. |

सदर परिषदेस विविध संख्या आणि औद्योगिक परिसरातून जवळ-जवळ २०० प्रतिनिधी हजर होते. सर्व वक्ते आणि परिषदेचे कामकाज पाहणारे अध्यक्ष यांचा परिषदेच्या कमिटीकडून त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांनी आपला बहुमुल्य वेळ आणि ज्ञान उपस्थितांना करून दिल्याबद्दल त्यांचे विशेष आभार व्यक्त केले. सर्व प्रतिनिधी, सन्माननीय वक्ते आणि आमंत्रित यांचेकडून परिषदेचे चांगल्या व नेटक्या व्यवस्थापनाबद्दल प्रशंसा केली.

**प्रयोगशाळा सहाय्यक आर. डी. पाटील सेवानिवृत्त**



वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनमधील आर. डी. पाटील हे प्रयोगशाळा सहाय्यक या पदावरून दि. ३१ डिसेंबर २०१६ रोजी सेवानिवृत्त झाले.

श्री. पाटील हे तंत्रनिकेतनमध्ये सुरुवातीला दि. १९ सप्टेंबर १९९० साली शिपाई म्हणून रुजू झाले होते. ते जवळ-जवळ २६ वर्षे तंत्रनिकेतनमध्ये कार्यरत होते. सुरुवातीला कार्यशाळेत नंतर काही वर्ष ग्रंथालय आणि माहितीकेंद्रात सेवा बजावली व शेवटी ते इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स विभागात प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून काम पाहात होते. शिवाय विद्या प्रसारक मंडळाच्या महाविद्यालयीन कर्मचारी सोसायटीचे श्री. पाटील हे सेक्रेटरी म्हणून काम पाहत होते.

त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक यांनी तंत्रनिकेतनतर्फे शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

श्री. पाटील हे अशा सक्रीय शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी युनियनचे सदस्य होते. युनियनच्यावतीने त्यांचा ज्येष्ठ सदस्य एस. जी. शेलार यांचे हस्ते शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन यथोचित सत्कार केला. प्रसंगी चंद्रकांत शिंगाडे, संतोष बारगोडे व संजय मोरे यांनी त्यांच्या विषयींची मनोगते व्यक्त केली. सत्कार समारंभ प्रसंगी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी तंत्रनिकेतनचे आपल्यावर फार मोठे उपकार असल्याचे भावपूर्ण उद्गार काढले आणि सदस्यांना एकोप्याने राहण्याचा सल्ला दिला व सदस्यांनीही त्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

•••

कुठल्याही कामाची सुरवात ही कठीणच असते, पण म्हणून त्याला मधेच सोडून देणे योग्य नाही.

(पृष्ठ क्रं. २ वरून - **संपादकीय**)

अवलंबिण्यावर दिसत आहे. ह्याचे ठळक उदाहरण म्हणजे ट्रम्प साहेबांची धोरणे होत.

अमेरिकन लोकांची अशी पक्की धारणा झाली आहे की, जागतिकीकरणाचा व आर्थिक उदारीकरणाचा सर्वात जास्त फायदा चीन व भारतासारख्या राष्ट्रांना झाला आहे व होत आहे. त्यातल्या त्यात गेल्या ३० ते ३५ वर्षांच्या कालावधीत ह्या जागतिक आर्थिक धोरणांचा वा जागतिकीकरणाचा फायदा चीनने मोठ्या कावेबाजपणे उचलला आहे असे अमेरिका मानते व ते अगदी बरोबर आहे यात काहीच शंका नाही. आज जगभरातच नव्हे तर अमेरिका, ब्रिटन व युरोपातील इतर प्रगत देशांमध्ये चिनी वस्तूंचा सुकाळ झाला आहे व चीन यातून करोडो 'डॉलर्स' व 'युरो' कमवत आहे. अमेरिकेतील २०१६ च्या निवडणूक प्रचारात ट्रम्प समर्थकांतर्फे तर असा प्रचार करण्यात आला व वृत्तपत्रांमध्ये देखील छापून आले की, 'अमेरिकेतील ४३० लक्ष गरिबांविषयी कोणीच बोलत नाही,' 'अमेरिका स्वदेशातील आर्थिक असमानतेकडे कानाडोळा करते आहे,' 'कामगारांकडे मतदान करण्यासाठी मतदान केंद्रांकडे जाण्यासाठी बसचे तिकीट विकत घेण्यासाठी पैसे नाहीत,' ही सर्व वाक्ये वाचून मनात विचार येतो की, अमेरिका हे प्रगत जगतातील सर्वात गरीब राष्ट्र आहे.

अमेरिकेत आर्थिक उदारमतवाद व जागतिकीकरणाच्या धोरणांविषयी सामान्यांमध्ये अत्यंत चीड असल्याचे जाणवते. सामान्य जनतेच्या मते ह्या धोरणांचा सर्वात जास्त फायदा जसा चीनला झाला तसाच अमेरिकन समाजातील श्रीमंत व उच्चभ्रूंना झालेला आहे. जे लक्षाधीश होते ते कोट्याधीश झाले आहेत, जे कोट्याधीश होते ते अब्जाधीश झाले आहेत असे अनेकांचे मत आहे. अमेरिकेतील ब्रूकलीन महाविद्यालयाच्या कोपलमन स्कूल ऑफ बिझनेस या संस्थेतील हर्शे फ्रीडमन (Hershey Friedman) ह्या प्राध्यापकाच्या मते अमेरिकेतील अनेक लोक आपला उदरनिर्वाह व्यवस्थित चालावा यासाठी दोन नोकऱ्या करताना आढळतात. फ्रीडमन पुढे जाऊन म्हणतात की, त्यांच्या एका प्राध्यापक मित्राची तर एवढी बेकार परिस्थिती झाली आहे की, त्याला भाडे भरणे कठीण होऊन बसले आहे व तो पूर्णपणे कर्जात बुडालेला आहे. त्यामुळे तो दिवसा ज्ञानार्जनाचे काम केल्यावर रात्री भाड्याची टॅक्सी चालविण्याचा गंभीरपणे विचार करत आहे. हे सगळे वाचून अमेरिकेत सर्व काही आलबेल नाही हे प्रकर्षाने जाणवते. त्यामुळेच ट्रम्प यांनी निवडणूक प्रचारादरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर तात्काळपणे ट्रान्स पॅसिफीक पार्टनरशीप ॲग्रीमेंट (Trans Pacific Partnership Agreement) हा करार रद्द केला आहे. त्यांच्या मते ह्या करारामुळे चीनच्या अर्थव्यवस्थेला चांगले तर अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला वाईट दिवस येत चालले होते.

अमेरिकेत वाहणाऱ्या ह्या जागतिकीकरणा विरोधी वाऱ्यांपूर्वी युरोपमध्ये एक महत्त्वाची घटना घडली. ही घटना म्हणजे 'ब्रेक्झीट' ही होय. 'ब्रेक्झीट' विषयी उहापोह करणारा लेख दिशाच्या जुलै २०१६ च्या अंकात छापण्यात आला होता. ह्या लेखाचे शीर्षक 'युरोपच्या संघातून युनायटेड किंगडमची नाट्यमय 'एक्झीट'–'ब्रेक्झीट' असे होते. ब्रिटनने युरोपीयन संघातून (युरोपीयन युनियन – European Union) बाहेर पडण्याच्या बाजूने कौल देणाऱ्या वा निर्णय देणाऱ्या जनमत कौलाला 'ब्रेक्झीट' असे संबोधले गेले. ब्रिटन हा युरोपमधील व तसे पाहिले तर जगाच्या राजकारणातील एक मातब्बर देश आहे. ह्या देशाने एकेकाळी भारतासह जगाच्या इतर अनेक भागांवर राज्य केले होते. हा

आवश्यकतेच्या वेळी जर कुणी तुमच्या सोबत नसेल तर अन्य वेळी त्यांचं सोबत असणं व्यर्थ आहे.

युरोपमधील एक अत्यंत प्रगत देश मानला जातो. युरोपीयन संघ ही युरोपातील अनेक देशांनी एकत्र येऊन बनलेली संघटना आहे. ही संघटना आर्थिक उदारीकरण, जागतिकीकरण व मुक्त जागतिक बाजारपेठांची पुरस्कर्ती आहे. हा संघ स्थापन करण्यासाठी युरोपातील फ्रान्ससारख्या देशांनी पुढाकार घेतलेला दिसतो. मात्र, सुरुवातीच्या काळात ब्रिटन ह्या संघापासून दूरच राहिलेला आढळतो. नंतरच्या काळात युरोपीयन संघातील राष्ट्रांना ह्या संघाच्या आर्थिक धोरणांचा फायदा होत आहे व त्यांची आर्थिक सुबत्ता होत आहे हे लक्षात आल्यावर ब्रिटन ह्या संघात सामील झाला. मात्र, सुरुवातीपासूनच ब्रिटनला युरोपच्या संघाविषयी पूर्ण विश्वास व आत्मीयता नव्हती हे जाणवते. २१ व्या शतकाच्या सुरुवातीपासून ब्रिटनमध्ये अशी भावना बळावत होती की, युरोपीयन संघामुळे वा युरोपच्या समुदायामुळे ब्रिटनच्या सार्वभौमत्त्वावर, लोकशाहीवर व स्वतंत्र निर्णय घेण्याच्या क्षमतेवर निर्बंध पडत आहेत. एवढेच नव्हे तर, ब्रिटनला मान्य नसणाऱ्या व काही अंशी घातक ठरू शकणाऱ्या युरोपीयन संघाच्या आर्थिक निर्णयांना व धोरणांना इच्छा नसताना देखील पाठिंबा द्यावा लागत आहे, असे अनेक ब्रिटिश नेत्यांचे व जनतेचे मत झाले होते. त्यामुळेच 'ब्रेक्झीट' नंतर लंडनचे माजी महापौर बोरीस जॉनसन यांची आता युनायटेड किंगडमला स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याची सुवर्णसंधी असून युनायटेड किंगडम आपले करविषयक कायदे स्वतःच्या गरजांनुसार बनविण्यास स्वतंत्र आहे ही प्रतिक्रिया बोलकी ठरते. युरोपीयन संघातून बाहेर पडावे व जागतिकीकरणाच्या रेट्यातून बाहेर पडून आपापल्या देशांतील अर्थव्यवस्थांकडे जास्तीत जास्त लक्ष देऊन स्वतःची आर्थिक प्रगती घडवून आणावी असा विचार युरोपातील अनेक राष्ट्रे सद्यस्थितीत करताना आढळतात.

या सर्व पार्श्वभूमीवर असा प्रश्न मनात येतो की, यापुढे जागतिकीकरण, उदारमतवादी अर्थव्यवस्था, व मुक्त बाजारपेठा हे शब्द इतिहास जमा होतील की काय? दुसरे महायुद्ध संपल्यानंतर साधारणतः १९४५ पासून जागतिकीकरणाचा गाडा हळूहळू पुढे जाताना दिसत होता. मात्र, २००८ सालापासून ह्या प्रक्रियेविषयी जगातील प्रगत देश ह्या धोरणांविषयी साशंक झालेले दिसतात. २००८ साली आर्थिक मंदीचे वातावरण होते व ह्याच काळात अमेरिकेच्या वित्तीय संस्थांना व बँकांना झटके लागलेले दिसतात. अगदी अमेरिकेची 'लेहमन ब्रदर्स' नामक अत्यंत मोठी बँक दिवाळखोरीत निघाली होती. ह्या सर्वांचा संबंध कुठेतरी जागतिकीकरण, उदारमतवादी आर्थिक धोरणे व मुक्त बाजारपेठांशी जोडण्यात आला. २००८ नंतर जगातील प्रगत देशांचा ह्या धोरणांपासून दूर जाण्याचा प्रवास खऱ्या अर्थाने सुरू होऊन त्याची परिणती जून २०१६ मध्ये 'ब्रेक्झीट' मध्ये तर नोव्हेंबर २०१६ मध्ये डोनाल्ड ट्रम्प यांच्या अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणूकीतील विजयात झाली असे म्हणावे लागेल.

ह्या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर भारतासारख्या देशांनी आपली आर्थिक धोरणे अत्यंत काळजीपूर्वक आखली पाहिजेत. जागतिकीकरणाच्या धोरणाचा भारताच्या अर्थव्यवस्थेला निश्चितच फायदा झालेला होता हे १९९१ ते २०१७ या काळातील भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल पाहता लक्षात येते. त्यामुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला खीळ बसल्यावर भारताच्या अर्थव्यवस्थेला सुरुवातीच्या काळात थोड्याफार प्रमाणाततरी झळ बसू शकेल असे तज्ज्ञांचे मत आहे. आपणास फक्त समस्या मांडून जमणार नाही; तर त्या समस्यांवर मात करण्यासाठीचे उपाय सुचवणे महत्त्वाचे आहे. ह्याबाबतीत भारतातील आघाडीचे अर्थतज्ज्ञ डॉ. मॉन्टेकसिंग अहलूवालिया यांनी म्हटले आहे की,

भारताने आता जागतिकीकरणाच्या पश्चातच्या काळाला तोंड देण्यासाठीची तयारी करायला हवी. ह्या तयारीचाच भाग म्हणून भारताने आशियातील इतर राष्ट्रांबरोबर व चीनबरोबर देखील मोठ्या प्रमाणात व्यापार वाढविण्यावर भर दिला पाहिजे. तसेच जागतिक बँक (वर्ल्ड बँक - World Bank), न्यू डेव्हलपमेंट बँक [New Development Bank ह्या बँकेला ब्रिक्स बँक (BRICS Bank) असे देखील संबोधले जाते. ब्राझील (Bazil) रशिया (Russia), भारत (India), चीन (China) व दक्षिण आफ्रिका (South Africa) ह्या देशांनी एकत्र येऊन आर्थिक व व्यापारी देवाण-घेवाणीसाठी 'ब्रिक्स' 'BRICS' ही संघटना स्थापन केली आहे. ह्या पाच देशांच्या नावातील इंग्रजी आद्याक्षरे एकत्र करून 'BRICS' हे संक्षीप्त नाव ह्या समूहास देण्यात आले आहे], इत्यादी बँकांच्या मदतीने सर्वच प्रगतनशील देशांनी आपापल्या देशांतील मुलभूत वा पायाभूत सुविधा तसेच वीज निर्मिती करण्यावर भर दिला पाहिजे असा सल्ला ते देतात. त्याचप्रमाणे जी-२० (G-20) ह्या २० देशांच्या समूहामध्ये भारताने आपली मते हिरीरीने मांडून आपल्या आर्थिक फायद्यात व व्यापारात वृद्धी होईल असे धोरण हाती घ्यावे लागेल असे देखील अहलूवालिया म्हणतात. याचे कारण सध्या जर्मनीसारखा जागतिकीकरणाला पूर्णतः विरोध नसलेला देश G-20 ह्या राष्ट्रसमूहाचा प्रमुख आहे. जी-२० (G-20) मध्ये एकोणीस देश व युरोपीयन संघाचा समावेश आहे. ह्या संघटनेचे एकोणीस सदस्य देश पुढीलप्रमाणे आहेत - अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, कॅनडा, चीन, फ्रान्स, जर्मनी, भारत, इंडोनेशिया, इटली, जपान, दक्षिण कोरिया, मेक्सिको, रशिया, सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका, तुर्कस्तान, युनायटेड किंगडम, युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका व विसावा सदस्य युरोपीयन संघ ही युरोपमधील विविध देशांची संघटना होय. एकमेकांच्या विविध आर्थिक धोरणांचा अभ्यास करून, त्यांचे परीक्षण करून उच्च पातळीवर आपापसांत चर्चा करून आंतरराष्ट्रीय वित्तीय स्थैर्य राखण्यासाठी तसेच जगातील औद्योगिकदृष्ट्या अतिशय प्रगत व प्रगतनशील देशांना एकत्र आणून जागतिक अर्थव्यवस्थेच्या विविध पैलूंविषयी चर्चा करण्यासाठीच्या उद्दीष्टाने जी-२० ह्या संघटनेची स्थापना १९९९ साली करण्यात आली. आपण सध्या कितीही मते भक्त केली तरी येणारा काळच खऱ्या अर्थाने जागतिकीरण, उदारमतवादी आर्थिक धोरणे व मुक्त जागतिक बाजारपेठा ह्यांचे भवितव्य ठरवणार आहे. त्यामुळे आपण ह्याबाबतीत लागलीच कुठलेही अनुमान न काढता मात्र त्याचवेळी सतर्क राहून काही काळ वाट पाहणे संयुक्तीक ठरेल.

**- सुभाष गं. शिंदे**

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.